www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 328   बुधवार दि. 13 ऑगस्ट २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

# भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा; सप्टेंबरपासून विमानसेवा सुरू करण्याचे सरकारचे कंपन्यांना निर्देश

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने भारतावर टीका करत आहेत. एवढंच नाही तर अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादलं. त्याआधी भारतावर २५ टक्के आयातशुल्क लादलं होतं. त्यामुळे एकूण आयातशुल्क ५० टक्क्यांवर पोहोचल्याने भारताला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमेरिका-भारत संबंध ताणले गेले आहेत. असं असतानाच आता भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचं पाहायला मिळत आहे. कारण भारत सरकारने एअर इंडिया, इंडिगोला पुढील महिन्यापर्यंत चीनला जाणारी सर्व उड्डाणे पुन्हा सुरू करण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे सप्टेंबरपासून ही विमानसेवा सुरू होण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. वृत्तानुसार, भारत आणि चीन पुढील महिन्यापासून दो्ही देशांतील विमान सेवा पुन्हा



होणार आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्याचे हे संकेत असल्याचं बोललं जात आहे. एका अहवालानुसार, भारत सरकारने एअर इंडिया आणि इंडिगोसारख्या विमान कंपन्यांना चीनला जाणारी उड्डाणे सुरू करण्यास सांगण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. कोविड-१९ साथीपासून दोन्ही देशांमधील हवाई वाहतूक बंद करण्यात आली होती. तसेच जून २०२० मध्ये पूर्व लडाखमधील गलवान खोऱ्यात सैन्यांवर झालेल्या प्राणघातक चकमकीनंतर भारत-चीन संबंध तणावपूर्ण झाले होते. ही घटना घडल्यानंतर दोन्ही राष्ट्रांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) सैन्य तैनात केले होते. त्यामुळे भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर लष्करी आणि राजनैतिक चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या होत्या. तसेच भारतात चिनी गुंतवणुकीवर निर्बंध, आयातीवरील कडक तपासणी आणि करोना साथीच्या काळात उड्डाणे थांबवण्यात आल्यामुळे आर्थिक आणि लोकांमधील देवाणघेवाणीवरही त्याचा परिणाम झाला होता. पण आता अलिकडच्या काही महिन्यांत हा तणाव कमी करण्यासाठी दोन्ही बाजूंनी संवाद सुरू

पान २ वर

## पालोद येथे महादेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न तीन दिवस गावात भक्तीमय वातावरण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- तालुक्यातील पालोद येथे संत महंतांच्या प्रमुख उपस्थितीत महादेवाची पिंड व इतर मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात पार पडला. त्यामुळे गावात तीन दिवसापासून भक्तीमय वातावरण पहावयास मिळाले.

ग्रामस्थांच्या वतीने मारुती मंदिर परिसरातील महादेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी महिलांनी आपल्या घरासमोर सडा टाकून रेखीव रांगोळी काढल्या होत्या. महादेव मूर्तीची सजवलेल्या रथातून पारंपारिक पद्धतीने वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली  मिरवणुकी दरम्यान रथातील महादेवाच्या पिंडीचे महिलांकडून पूजन तसेच औक्षण करण्यात येत होते. या मिरवणुकीत महिलांनी डोक्यावर सजवलेले कलश घेत सहभाग नोंदवला. यानंतर मिरवणूक मुख्य मारुती मंदिराजवळ आल्यानंतर साधू संतांच्या व महंतांच्या हस्ते मूर्तीला दुग्धाभिषेक करण्यात आला. या ठिकाणी दोन दिवसापासून मूर्तीचे पूजन तसेच कीर्तन संगीत भजन अधिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याने परिसरातील नागरिक देखील सहभागी झाले होते. यावेळी 11 जोडप्यांच्या हस्ते
तसेच स्थानिक पुजारी व साधु महंतांच्या प्रमुख उपस्थितीत मूर्तीचे विधिवत पूजन करून प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक भक्तांची उपस्थिती होती.



# जिल्हा परिषदेची शाळा लोकसहभागातून झाली डिजिटल.

दैनिक युवक आधार'-
राजू शिंदे

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दुधा केंद्र- किर्ला तालुका- मंठा जिल्हा- जालना या शाळेत विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यात येते. यासाठी लोकसहभागातून शाळेला नेहमी मदत मिळत असते शाळा डिजिटल करण्यात गावातील सर्वांचा सहभाग मोलाचा होता. विद्यार्थ्यांना आनंदायी शिक्षण मिळावे यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना ज्ञानरचनावादा नुसार विद्यार्थ्यांना गटकार्य तसेच शैक्षणिक साहित्य चा वापर व डिजिटल साधनांचा उपयोग यामुळे विद्यार्थी अध्ययन करण्यास उत्सुक असतात. तसेच या शाळेत




विद्यार्थ्यांना कृतीयुक्त अध्यापन करण्यास उपयोगी पडतील असे नवोपक्रम घेतले जातात. सध्या शाळा हिरवळीचे खत, गांडूळ खत प्रकल्प , परस बाग व शालेय विद्यार्थी बचत बँक हे उपक्रम योग्य पद्धतीने विद्यार्थ्यांच्या मदतीने हाताळले जातात. यामुळे शाळेत नवचैतन्य निर्माण झालेले आहे. त्यामुळे शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यात प्रथम व तृतीय क्रमांक मिळाले ला आहे यासाठी शालेय समिती, ग्रामपंचायत व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती,नवयुवक मंडळाची शाळेसाठी भरभरून मदत करत असतात. त्याचप्रमाणे शाळेला मुख्याध्यापक श्री कांगणे सर, शिक्षक श्री खंदारे सर, पिसे सर यांच्यामुळे शाळेत नेहमी नवचैतन्य निर्माण करण्याचे काम केले जाते.

## सिल्लोड वकील महासंघ यांचे मार्फत कन्या सन्मान दिवस शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- दिनांक 14 ऑगस्ट 2025 रोजी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व दिवशी सिल्लोड तालुक्यातील सिल्लोड,निल्लोड,अजिंठा,गोळेगाव बुद्रुक,उंडणगाव ,अंभई ,आमठाणा,बोरगाव बाजार ,भराडी,पालोद व शिवना या 11 महसूल मंडळ मुख्यालय असलेल्या गावात "कन्या सन्मान दिवस" कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे .त्यामध्ये सिल्लोड वकील महासंघ मार्गफत गर्भलिंग विरोधी कायदा (PCPNDT) कायदा यांच्या जनजागरणासाठी "कन्या सन्मान दिवस" कार्यक्रमा मध्ये गर्भलिंग तपासणी विरोधी कायदा व त्यातील शिक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे,

# ७७ वर्षीय मधुमेही रुग्णावर यशस्वी कोपर(एल्बो) प्रत्यारोपण

### दुर्मिळ आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलच्या डॉक्टरांना आले यश

**दैनिक युवक आधार**
***नवी मुंबई:***

मेडिकव्हर रुग्णालयाचे ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. निकिल भारंबे यांच्या नेतृत्वाखाली टिमने गंभीर संधिवात आणि हाताच्या हालचालींवर मर्यादा आलेल्या ७७ वर्षीय मधुमेही व्यक्तीवर यशस्वी कोपर(एल्बो) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केली. सुमारे ३ तास चाललेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या केवळ वेदनाच कमी झाल्या नाही तर त्याच्या हाताच्या हालचालींमध्येही सुधारणा दिसून आली. रुग्ण आता स्वतःच्या हाताने जेवतो, लिहितो तसेच दैनंदिन कामांसाठी त्याला आधाराची गरज भासत नाही.

*खारघर येथे राहणारे श्री रामचंद्र तलप* या रुग्णाला हाताच्या उजव्या कोपऱ्याला गंभीर ऑस्टियोआर्थरायटिसचा त्रास सतावू लागला, ज्यामुळे रुग्णाला त्याचा हात पूर्णपणे वाकवता येत नव्हता. रुग्णाला जवळजवळ १ वर्षापासून ऑस्टियोआर्थरायटिस आणि गेल्या १५ वर्षांपासून मधुमेह होता आणि त्याचबरोबर कोपरावर दोन वेळा पडून आघात झाल्याचा वैद्यकिय इतिहास होता. त्यापैकी एका आघातामुळे उजव्या बाजूस रेडियल नेक फ्रॅक्चर झाले होते. सुरुवातीला प्लास्टर कास्टने उपचार करण्यात आले मात्र दुर्दैवाने, हे फार काळ टिकले नाही. वारंवार पडल्यामुळे सांध्यांच्या कार्यात बिघाड होऊन दैनंदिन कामांमध्ये रुग्णाला वेदना सतावू लागल्या. रुग्णाला दैनंदिन कामांसाठी कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून रहावे लागत होते.

दुखापतींच्या घटना आणि अनियंत्रित रक्तातील साखरेच्या पातळीमुळे रुग्णाचा संधिवात वाढला, ज्यामुळे त्याला स्वतःच्या हाताने जेवायला देखील अशक्य झाले. वेदनेच्या तीव्रतेमुळे रुग्णाला नैराश्य आले. इतरांवर अवलंबून रहावे लागत असल्याने तो खचून गेला होता. त्यानंतर रुग्णाने मेडिकव्हर हॉस्पिटलकडे धाव घेतली जिथे त्याला जगण्याची नवी दिशा मिळाली.

*ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. निखिल भारंबे सांगतात की,* रुग्णाला होणाऱ्या वेदना आणि स्वतच्या हाताने




जेवता न येणे यामुळे रुग्ण निराश झाला होता. आम्ही रुग्णाची संपूर्ण तपासणी केली. सविस्तर तपासणी आणि समुपदेशनानंतर आम्ही रुग्णाचे कोपर(एल्बो) प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला. ही एक दुर्मिळ आणि आव्हानात्मक प्रक्रिया होती. भारतात 5% पेक्षा कमी रुग्णांच्या बाबतीत अशी शस्त्रक्रिया केली जाते.

*डॉ. निखिल भारंबे पुढे सांगतात की,* या शस्त्रक्रियेचा उद्देश हा निकामी झालेले सांधे काढून टाकणे आणि त्या जागी ३ तास चालणाऱ्या शस्त्रक्रियेत कोपराटला जोडणाऱ्या सांधा हा धातूने जोडला गेला . ही शस्त्रक्रिया गुंतागुंतीची आहे कारण यात हाताच्या हाडाचा खालचा भाग कापला जातो, जो नाजूक असतो आणि शस्त्रक्रियेदरम्यान फ्रॅक्चर होऊ शकतो, ज्यामुळे शस्त्रक्रियेचा परिणाम बिघडू शकतो. या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या कोपराची हालचाल सुधारली असून १० ते १२० अंशांपर्यंत हात हलविता येऊ लागला, ज्यामुळे तो स्वतःच्या हाताने जेवणे तसेच आवश्यक दैनंदिन कामांना रुग्णाने सुरुवात केली. जेव्हा रुग्ण आमच्याकडे आला तेव्हा तो भावनिक आणि शारीरिकदृष्ट्या कमकुवत झाला होता, त्याच्या हाताच्या कोपऱ्याच्या स्नायुंमधील हलचाल मंदावल्याने तो स्वतःच्या हाताने जेवू शकत नव्हता. या शस्त्रक्रियेचा उद्देश केवळ रुग्णाच्या वेदना कमी करणे नाही तर त्याच्या हाताची हलचाल पूर्ववत करणे हा होता.

मी अशा टप्प्यावर पोहोचलो होतो जिथे मी जेवणासाठी चमचा देखील धरु शकत नव्हतो. सौंदर्यप्रसाधनांचा वापर किंवा फक्त हात हलवणे यासारख्या साध्या गोष्टींकरिका देखील संघर्ष करावा लागत होता. हळूहळू मला नैराश्य येऊ लागले. मात्र जेव्हा मी डॉ. भारंबे यांना भेटलो तेव्हा मला जगण्याची दुसरी संधी गवसली. आज, मी स्वतःच्या हाताने जेवतो, हाताची हालचाल करू शकतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मला पुन्हा पुर्वीसारखे सामान्य आयुष्य जगता येत आहे. यासाठी मी संपूर्ण टिमचे मनापासून आभार मानतो *अशी प्रतिक्रिया रुग्ण रामचंद्र तलप यांनी व्यक्त केली.*

## आमदार प्रशांत ठाकूर चषक 2025 वक्तृत्व स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना

### कळंबोली विद्यालयात 'शाळा अंतर्गत फेरी' उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांना आपली मते प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी आणि वक्तृत्वकौशल्य विकसित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'शाळा अंतर्गत फेरी' उत्साहात पार पडली.

विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्त भारत, मोबाईल नसते तर?, इंटरनेट – वरदान की शाप? अशा विविध विषयांवर जोशपूर्ण आणि प्रभावी भाषणे दिली. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, विचार मांडण्याची क्षमता सुधारली आणि स्टेज भीती कमी झाली. या फेरीतून प्रत्येक इयत्तेतून ३ विद्यार्थी पुढील अंतरशालेय फेरीसाठी




पात्र ठरणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी स्पर्धात्मक भावना निर्माण झाली असून पुढील फेरीसाठी उत्सुकता वाढली आहे. कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या पुढाकारातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडत असून शिक्षक, पालक आणि शाळा प्रशासन यांचा मोलाचा सहभाग लाभत आहे.

# जिद्द आणि विस्वास मनात आणले तर तुम्ही घडवाल इतिहास

### ( एड. अनिकेत उज्ज्वल निकम)

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

वसुंधरा फाउंडेशन व भारतीय जनता पार्टी, उत्तर मध्य मुंबई जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने १० वी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ दि.१० ऑगस्ट २०२५ गुरुद्वारा सभागृह, खार (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

याकार्यक्रमाचे प्रमुख अतिथी एड. अनिकेत निकम भाजपा प्रदेश प्रवक्ते, अनिल गलगले जेष्ठ पत्रकार, सुहास आडिवरेकर भाजपा मुंबई उपाध्यक्ष, महेश पारकर भाजपा मुंबई चिटणीस, विरेंद्र म्हात्रे जिल्हाध्यक्ष उत्तर मध्य मुंबई, सुशम सावंत मा. जिल्हाध्यक्ष, अनिल आयकर ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष, शैलेश पाटील मंडळ अध्यक्ष खार सांताक्रूझ (पूर्व) नवनाथ दिघे वार्ड अध्यक्ष, प्रभाग ९४, लोकेश दवे माजी वार्ड अध्यक्ष, प्रभाग ९४, राजन आयकर मा.विधानसभा उपाध्यक्ष उपस्थित होते.

या प्रसंगी एड.अनिकेत निकम म्हणाले




जेव्हा विषय देशाचा येतो तेव्हा आपण देशाचे जाज्वल्य अभिमान बाळगलाच पाहिजे. काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत मातृभूमीवर कननिकन हा माझा आहे. वाहणाऱ्या प्रत्येक वाऱ्यांची जिद्द आणि विस्वास मनात आणले तर तुम्हीच घडवाल इतिहास. अनिल गलगले पत्रकार, सुहास आडिवरेकर मुंबई उपाध्यक्ष, महेश पारकर मुंबई चिटणीस यांची पण भाषणे झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक राजेश दाभोळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन अध्यक्ष विवेका दाभोळकर यांनी केले.

# "सोशल मीडियाऐवजी पुस्तकांच्या जाळ्यात अडका ! राष्ट्रीय ग्रंथालय दिनानिमित्त विद्यार्थ्यांना संदेश"









**दैनिक युवक आधार**

उरण रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर ग्रंथालय म्हणजे फक्त पुस्तकांचे ठिकाण नाही, तर ते ज्ञानाचे आणि माहितीचे भांडार आहे. ग्रंथालये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी खूप महत्त्वाची आहेत. भारतीय गणितज्ञ आणि ग्रंथालयशास्त्रज्ञ ज्यांना भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक मानले जाते. ते म्हणजे डॉ शियाली रामामृत रंगनाथन त्यांनी ग्रंथालयांसाठी अनेक महत्त्वपूर्ण संकल्पना आणि सूत्रे दिली, जी आजही वापरली जातात. त्यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ साली झाला.या त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे त्यांचा जन्मदिवस हा सर्वत्र 'राष्ट्रीय ग्रंथालय दिन' म्हणून साजरा होत आहे. याच दिनाचे औचित्य साधून आयक्यूएसीच्या तत्वाखाली ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीचे ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ नवी मुंबई सानपाडा येथे मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन वेगवेगळे उपक्रम घेत साजरा करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन विधी शाखेचे मुख्याध्यापक गोरधन देवनानी सर यांनी केले तसेच त्यांच्यासोबत उपस्थित मान्यवरांनी, डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन केले. त्यानंतर मुख्याध्यापकांनी मुलांना ग्रंथालयाचे महत्त्व पटवून देत सोशल मीडियाच्या जाळ्यात न अडकता पुस्तकांच्या जाळ्यात अडका, ज्यामुळे तुम्हाला ज्ञानाच्या अथांग सागरात बुडून यशस्वी भविष्य घडवता येईल असा संदेश दिला. तसेच युतीका सावंत यांनीही विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देत आपले मनोगत व्यक्त केले. ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ च्या ग्रंथपाल कल्पना गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना वाचनालयाच्या नियमांसोबत पुस्तक वाचनाचे महत्त्व पटवून देत मार्गदर्शन केले. यावेळी वकृत्व स्पर्धा आणि वाचना संदर्भात काही गेमही विद्यार्थ्यांसोबत घेण्यात आले. ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ च्या महाविद्यालयात नेहमीच वेगवेगळे उपक्रम होत असतात. त्यात आज झालेल्या 'राष्ट्रीय ग्रंथालय दिनामुळे विद्यार्थ्यांना वाचनाविषयी नक्कीच प्रेरणा मिळेल. सदर उपक्रमाच्या वेळी उपस्थित मान्यवरांमध्ये मार्गदर्शक कॉलेजचे मुख्याध्यापक गोरधन देवनानी सर, उपमुख्याध्यापिका युतिका सावंत , ग्रंथपाल कल्पना गायकवाड , आणि त्यांच्या सहकारी रोशनी मॅडम, तसेच कार्यक्रमाच्या नियोजिका मानसी आशर, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच विधी शाखेचे विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जॉन वानिया यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिशा कुलाये या विद्यार्थ्यांनी केले. एकंदरीत 'राष्ट्रीय ग्रंथालय दिन' ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ येथे उत्साहात पार पडला.

## खांदा कॉलनीत जुन्या मल्लनिसरान लाईन लीकेज मुळे सोसायटीतील गटारे झाली चोक अप नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

खांदा कॉलनी सेक्टर 7 व सेक्टर 9 मध्ये मुख्य मल्लनिसरान लाईन लिकेज झाल्यामुळे ड्रेनेज लाईनचे पाणी चोक अप झाल्यामुळे हे पाणी पिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्या मध्ये मिक्स होऊन माणसे आजारी पडु लागले आहेत अनेक नागरिकाना उलट्या जुलाब होऊआहेत या प्रकरणाची गंभीर नोद घेऊन परिसरातील माजी उपमहापौर सिताताई पाटील यांनी ताबडतोब महापालिकेची गाडी बोलवून ड्रेनेज लाईन साफ करून घेतली तसेच नागरीकांचे आरोग्य धोक्यात जाऊ नये म्हणून ताबोडतोब ड्रेनेज लाईनचे लिकेज् काढण्यास सांगितले आहे. खांदा कॉलनीतल अनेक मल्लनिसरान लाईन जुन्या झाल्या आहेत त्या अनेक ठिकाणी लिकेज् असल्यामुळे अनेक सोसायटीतील चेंबरचे पाणी या ड्रेनेज लाईनच्या तोंडावर येऊन थांबते याच ठिकाणाहून पाण्याचे पाईप लाईन जात असल्याने पाणी मिक्स होऊन अनेक जण आजारी पडु लागले आहेत ही परिस्थिती लक्षात घेऊन माजी उपमहापौर सिताताई पाटील यांनी पनवेल महापालिकेला विनंती करून या लाईन दुरूस्त करून घेतल्या या लाईन नाल्या पर्यंत जातं असल्याने नाल्या पर्यंतच्या लाईन साफ करून सोसायटीतील नागरीकांना दिलासा द्यावा अशी विनंती माजी उपमहापौर सिताताई पाटील यांनी पनवेल महापालिकेकडे केली आहे




## मोहदरी येथील शेतकऱ्याचे 3 एकर सोयाबीन जाणवरांनी केले नष्ट

**दैनिक युवक आधार**
**उनरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड**



रानटी जनावरांचा शेतकऱ्यांना होणारा त्रास हा ग्रामीण भागात एक गंभीर आणि वाढता प्रश्न आहे. यामध्ये प्रामुख्याने वनक्षेत्रालगतची शेते व गावं प्रभावित होतात पीक उपटून खाणे जमीन उकरणे आणि नष्ट करणे.शेतात

ज्या शेतकऱ्याचे पिकाचे नुकसान झाले आहे ते ववन्यप्राण्यामुळे झाले आहे त्यामुळे पहिले वनविभाग यांना शेतकऱ्यांनी अर्ज करावा त्यानंतर आम्ही पंचनामा करण्यास येऊ नंतर त्यांना योग्य ती मदत मिळेल.

**तलाठी**
**एस. पी. चंद्रवंशी**

मेहनत करून पीक उगावावे लागते बी बियाणी साठी स्वतः खर्च करावा लागतो आणि या प्राण्यामुळे शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो असाच प्रकार उमरखेड तालुक्यातील मोहदरी येथे घडला आहे शेतकरी राजू गव्हाणे यांनी त्याच्या 3 एकर शेतीत त्यांनी सोयाबीन पेरले होते पण 11 ऑगस्ट रात्री च्या सुमारास रोही आणि डुकर यांनी 3 एकर सोयाबीन चा संपूर्ण सत्यानाश केला आहे यामुळे त्यांना अतिशय जास्त नुकसान झाले आहे त्यानी तलाठी आणि संबंधित विभागाला माहिती दिली आहे त्याच्या शेतीचा पंचनामा करून त्यांना तात्काळ मदत द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे.

## पनवेलच्या विकासाला आयुक्तांचे पारदर्शक नेतृत्व, मानवी हक्क संरक्षण फेडरेशनकडून सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**



पनवेल शहराला 'स्मार्ट सिटी' बनवण्याच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाची दखल घेत मानवी हक्क संरक्षण फेडरेशनने त्यांचा विशेष गौरव केला आहे. सोमवार, ११ ऑगस्ट रोजी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांची भेट घेऊन त्यांना सन्मानपत्र प्रदान केले.

या भेटीदरम्यान, फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर – कच्छी यांनी आयुक्तांचे पनवेल शहरासाठीचे महत्त्वपूर्ण योगदान आणि पारदर्शक कार्यप्रणालीची प्रशंसा केली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आयुक्त घेत असलेल्या पुढाकाराबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

या खास भेटीत फेडरेशनने काही महत्त्वाच्या विषयांवर आयुक्तांशी चर्चा केली आणि एक निवेदन सादर केले. यावर आयुक्त चितळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, संबंधित मागण्यांवर लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार विकास पाटील, सुरज नागे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

आयुक्तांच्या या सहभागामुळे पनवेलकरांच्या आशा पल्लवित झाल्या असून, शहराच्या प्रगतीसाठी प्रशासन आणि सामाजिक संस्था यांच्यातील हा समन्वय महत्त्वाचा मानला जात आहे.

## तरूण शेतकऱ्याचा तलावात बुडून मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**



पांढरकवडा:-तालुक्यातील आसोली गावातील एक मेहनती आणि जबाबदार युवा शेतकरी अमित बंडू पवार वय 23 याचा दुर्दैवी मृत्यू सोमवारी सकाळी झाला. शेतीच्या कामासाठी पाणी भरण्यासाठी गेलेला हा तरुण तलावात बुडाल्याने संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार,अमित हा आपल्या शेतीत फवारणी करण्यासाठी पाणी भरण्यासाठी बैल बंडी घेऊन तलावाच्या काठावर गेला होता.अचानक बैल भुजडल्याने ते थेट तलावाच्या पाण्यात गेले.बैल बुडू नयेत म्हणून अमित तात्काळ तलावात उतरला.मात्र पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्याखाली गेला आणि पुन्हा वर आला नाही. अमित बराच वेळ दिसत नसल्याने आणि बैल गाडी तलावात असल्याने ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली. घटनेची माहिती त्वरित गावाचे पोलिस पाटील देवीदास तोडसाम यांना देण्यात आली. ही घटना घाटंजी पोलिस स्टेशन हद्दीतील असल्याने तेथील जमादार मेश्राम व शिपाई लोखंडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.काही वेळानंतर मोहदा व रुंझा येथील युवकांच्या मदतीने अमितचा मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला आणि पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.या घटनेने संपूर्ण आसोली गाव शोकसागरात बुडाले आहे.अमितचे वडील काही वर्षांपूर्वी निधन पावले होते. तो आपल्या आईसोबत राहत होता आणि कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. घराचा आधारस्तंभ आणि मेहनती तरुण असा त्याचा सर्वत्र परिचय होता. त्याच्या अकस्मात मृत्यूने आईवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.अमितच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि गावकरी घटनास्थळी धावले. सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून, एका आशावादी आणि कर्तव्यदक्ष जीवनाचा असा अचानक झालेला अंत सर्वांना अस्वस्थ करून गेला आहे.

## ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराविरोधात आमरण उपोषण – दुसऱ्या दिवशीही आंदोलन सुरूच

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर –**




परतूर तालुक्यातील आष्टी (धो. जो.) ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराविरोधात सामाजिक कार्यकर्ते भगवान रंगनाथ वाघमारे यांनी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरुवात केली असून, आज या आंदोलनाचा तिसरा दिवस आहे.

वाघमारे यांनी ग्रामपंचायतीतील विकासकामे व MREGS योजनेत झालेल्या लाखो रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करून, संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, स्थानिक पातळीवर चौकशी समितीने तपास करूनही दोषींवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

उपोषणकर्त्यांचा ठाम इशारा आहे की, "दोषींवर तात्काळ निलंबन आणि गुन्हा दाखल न झाल्यास, हे आमरण उपोषण सुरूच राहील." त्यांनी भ्रष्टाचार रोखण्यासाठी प्रशासनाने पारदर्शक चौकशी व कायदेशीर पावले उचलणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

घटनास्थळी काही स्थानिक नागरिकांनीही भेट देऊन वाघमारे यांना समर्थन दर्शविले. दुसरीकडे, प्रशासनाने यावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

या प्रकरणामुळे गावात व परिसरात चर्चांना उधाण आले असून, येत्या काही दिवसांत प्रशासनाची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

स्थान: विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

तारीख: १२ ऑगस्ट २०२५

## शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करा व ईव्हीएम हटवून बॅलेट पेपर वर निवडणुका घ्या - राष्ट्रीय संविधान बचाव अभियान प्रा. देविदास इंगळे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड – दिनांक 12 ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे जिल्हाधिकारी साहेबांची भेट घेऊन शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमुक्ती करून सातबारा कोरा करावा आणि ईव्हीएम हटवून हटवून बॅलेट पेपर वरती निवडणुका घ्याव्यात मतदार यादीत असणारा घोळ कमी करून नवीन याद्या कराव्यात अशा आशयाचे निवेदन माननीय मुख्यमंत्री,मुख्य निवडणूक आयुक्त, राज्यपाल यांना जिल्हाधिकारी मार्फत निवेदन देण्यात आले.

जर या मागण्या त्वरित मान्य करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि जनतेच्या मनात निवडणुकीविषयी जो ईव्हीएम च्या बाबतीत संभ्रम आहे तो ईव्हीएम हटवून निवडणुका बॅलेट पेपर वरती घ्याव्यात आणि मतदार यादीत असणारा घोळ नवीन मतदान याद्या करावा करून दूर करावा.या मागण्या मान्य नाही झाल्यास 16 ऑगस्ट 2025 पासून बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी राष्ट्रीय संविधान बचाव अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. देविदास इंगळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा सरचिटणीस माननीय गणेश अण्णा तादलापुकर, मा. नागोराव आंबटवार, निवृत्ती गायकवाड, कॉ. दिगंबर



घायाळे,के. डी. वाघमारे. वाघमारे एम. एम., कॉ. दिलीप कंधारे, कॉ. संजय कंधारे, कॉ. भागवत कंधारे, माणिका बोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

## भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा

**पान १ वरून**

असल्यामुळे दोन्ही देशांतील संबंध सुधारण्याची चिन्हे आहेत.

**SCO परिषदेसाठी चीन करणार मोदींचं स्वागत**

अमेरिका सातत्याने भारतावर टीका करत असतानाच आता भारत आणि चीनमधील संबंध सुधारण्याची होण्याची शक्यता आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) च्या बैठकीसाठी चीनला जाणार आहेत. त्यामुळे भारत आणि चीनमधील संबंध सुधारण्याची शक्यता आहे. ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या काळात तियानजिन येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आलेलं आहे. या बैठकीत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे देखील उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय बैठक होण्याची शक्यता आहे.

**चीनने काय म्हटलं?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी एससीओ शिखर परिषदेसाठी चीनला भेट देणार असल्याच्या वृत्तांनंतर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी म्हटलं की, "एससीओ तियानजिन शिखर परिषद ही एससीओच्या स्थापनेपासूनची सर्वात मोठी शिखर परिषद असेल. एससीओ तियानजिन शिखर परिषदेसाठी चीन पंतप्रधान मोदींचे चीनमध्ये स्वागत करत आहे. आम्हाला विश्वास आहे की सर्व पक्षांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे तियानजिन शिखर परिषद एकता, मैत्री आणि फलदायी मेळावा असेल आणि एससीओ विकासाच्या एका नवीन टप्प्यात प्रवेश करेल. ज्यामध्ये अधिक एकता, समन्वय, गतिमानता आणि उत्पादकता असेल."

# सफाई कामगारांसाठी बेमुदत उपोषण; मनपा मुख्यालयासमोर महादेव वाघमारे लक्षवे धी लक्ष वेधणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल महानगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी सफाई व घंटागाडी कामगारांच्या प्रलंबित मागण्या अद्यापही पूर्ण करण्यात आलेल्या नाही. या संदर्भात वारंवार अर्ज विनंती करूनही याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे येत्या 14 ऑगस्ट पासून आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे मनपा मुख्यालयाच्या समोर बेमुदत उपोषण करणार आहे. त्यांनी या आशयाचे पत्र सुद्धा प्रशासनाला दिले आहे.



पनवेल महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात कंत्राटी कामगार स्वच्छता विषयी कामे करतात. एकशे दहा किलोमीटर क्षेत्रफळ असणाऱ्या मनपा क्षेत्राचे आरोग्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी ते प्रामाणिकपणे पार पाडतात. परिसरातील कचरा उचलून तो क्षेपणभूमीवर घेऊन जाण्याचे काम घंटागाडी कामगार करतात. त्यांच्या न्याय हक्कासाठी आझाद कामगार संघटना गेल्या काही वर्षांपासून काम करत आहे. यासंदर्भात प्रलंबित मागण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी महापालिकेकडे पत्र व्यवहार केले. प्रत्यक्ष अधिकाऱ्यांना भेटून याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली. परंतु याबाबत हालचाली न झाल्यामुळे शेवटी आझाद कामगार संघटनेने बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले आहे. गुरुवारी मनपाच्या मुख्यालयासमोर वाघमारे उपोषणाला बसणार आहेत. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत त्याचबरोबर यासंदर्भात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने पावले उचलले जात नाहीत. तोपर्यंत हे उपोषण सुरूच ठेवण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

यामध्ये प्रामुख्याने सफाई कामगारांचा व त्यांच्या कुटुंबाचा दोन लाख आरोग्य विमा काढणे, घंटागाडी चालक व संकलक या कामगाराचा दीड लाख रूपये आरोग्य विमा काढला आहे. तो बंद करून दोन लाख रूपये चा आरोग्य विमा काढून कामगारांची दोन मुले व आई वडिलांचा या विमा योजनेत सहभाग करून घ्यावा, नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत पगारी रजा दिल्या नाहीत. त्यांचे पैसे देण्यात यावेत, घंटागाडी संकलक व वाहनचालक यांना नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत वैयक्तिक सुरक्षा उपकरणे कामगारांना दिली नाहीत. त्याचे प्रत्येक कामगाराला ६८५४ रूपये देण्यात यावे, घंटागाडी कामगारांचे प्रलंबित बोनस व ग्रजुतीचे पैसे देण, आणि त्याचबरोबर काही कामगारांची हॉस्पिटल मधील बिलाचे पैसे देण्यात यावे अश्या मागण्या असल्याची माहिती महादेव वाघमारे यांनी दिली आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# वाणिज्य पदवीधरांना करिअर च्या मोठ्या संधी- सी. ए. उल्हास बोरसे

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिध राहुल कुलकर्णी**

निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात वाणिज्य मंडळ उद्घाटन कार्यक्रम अंतर्गत वाणिज्य विभागातील विविध संधी याविषयी उद्बोधक व्याख्यानाचे आयोजन,

नाशिक येथील सुप्रसिद्ध सनदी लेखापाल (CHARTERED ACCOUNTANT) उल्हास बोरसे यांचे मार्गदर्शन

वाणिज्य विद्या शाखेमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी हे उद्योग व्यवसाय सहकार,बँकिंग लेखापाल, गुंतवणूकदार,कर सल्लागार, शेअर मार्केट, अकाउंटं, अधिक क्षेत्रात यशस्वी होतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे मोठी क्षमता असते. त्यांनी कृषी बरोबरच अनेक व्यावसायिक संधी शोधून उद्योगधंदे उभारले पाहिजेत. ते चांगले उद्योजक निश्चित होतील. आपली आवड ही आपले करियर म्हणून निवडतांना प्रत्येकाने अंतर्मुख होऊन एक विचार करणे गरजेचे आहे तो म्हणजे, फक्त आवड महत्वाची नसून त्या आवडत्या कामात आपण स्वतः सर्वोत्तम आहोत का ?, त्याला समाजाची मान्यता आहे का, त्यातून आपल्याला योग्य अर्थाजन होईल का, आणि बदलत्या काळानुसार स्वतः कष्ट करण्याची मानसिकता असेल तर आपण निश्चितच मोठ्या यशला गवसणी घालू शकतो, एवढेच नव्हे तर महाविद्यालयीन जीवनातील पहिले पाच वर्ष स्वतःचे करियर घडविण्यासाठी जे विद्यार्थी मेहनत घेऊन सतत प्रयत्नशील राहतील तेच विद्यार्थी भविष्यातील पन्नास वर्ष आनंदाने जगतील, म्हणूनच आपले कार्य सर्वोत्तम करणे हाच यशाचा खरा राजमार्ग आहे असे प्रतिपादन




नाशिक येथील सुप्रसिद्ध सी. ए. उल्हास बोरसे यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य मंडळ उद्घाटन प्रसंगी दि. ११ ऑगस्ट रोजी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य राहुल दवते, उपप्राचार्य डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. नरेश सोनटक्के, डॉ. सुसान लॉरेन्शिया, डॉ. रोहिदास शिंदे, डॉ. महेश बनकर आदी उपस्थित होते.

उल्हास बोरसे पुढे म्हणाले की, वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी पुस्तकी शिक्षणाला कृतीयुक्त अनुभवाची जोड दिल्यास ते लवकर आपल्या पायावर उभे राहण्यास सक्षम होतील. वाणिज्य विभागाची पदवी हा फक्त पाया असून त्यापुढील घेतलेले शिक्षणच खऱ्या अर्थी विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधी निर्माण करून देतात. ही गोष्ट कोणीही दुर्लक्षित करू नये. छोटी सुरुवात, सातत्य आणि परिपक्व व्यावसायिक दृष्टीकोन बाळगल्यास निश्चितच सर्वांना यशाची हमी मिळेल. असा विश्वास व्यक्त केला.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी सांगितले की,
मानवी इतिहासा इतकाच वाणिज्य व्यवहार जुना आहे. सध्याचे युग हे औद्योगिक प्रगतीचे, आधुनिक तंत्रज्ञानचे आहे. जागतिक बाजारेठेमुळे वाणिज्य शाखेमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्तम संधी आहेत. विद्यार्थ्यांनी वाणिज्य शाखेतील विविध कोर्सेस पूर्ण केल्यास त्यांना शासकीय, निमशासकीय, सहकार क्षेत्र, खाजगी कंपन्या, सेवा क्षेत्र आदी क्षेत्रात देश आणि विदेशात विविध पद भरताना वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचा आग्रक्रमाने विचार केला जाऊन त्यांच्या कर्तुत्वाला वाव आहे. म्हणून तुम्ही हुशार आणि प्रयत्नशील मित्रांची संगत करा म्हणजे तुम्हीही अधिक प्रयत्नवादी आणि हुशार व्हाल. गरीब गरीब होतो आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होतो ही संकल्पना आपल्याला मोडायची आहे. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा आपण श्रीमंत किंवा यशस्वी व्यावसायिक आणि आपल्यापेक्षा विचाराने आणि कृतीने मोठ्या मित्रांची सांगत करू. कारण आधुनिक विचार, व्यावसायिक दृष्टिकोन आपण आणि योग्य निर्णय आपल्या जीवनाला व करियरला नवीन कलाटणी देईल. असे मत व्यक्त केले.

राहुल दवते यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, निफाड महाविद्यालय शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामजिक अश्या विविध प्रकारचे उपक्रम विद्यार्थी केंद्रबिंदू ठेऊन नियमित राबवित असते. यातून अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. निश्चितच यातून एक सक्षम पिढी घडत असल्याचे समाधान व्यक्त करून पुढील उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

प्रा. नरेश सोनटक्के यांनी प्रास्तविकात वाणिज्य मंडळाचा उद्देश सांगून वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा ऋचा जगताप यांनी केले तर आभार डॉ. प्रवीण ढेपले यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीततेसाठी प्रा. निकेतन महाले, प्रा माधुरी थेटे, प्रा दीपाली जगताप, प्रा. अविनाश पिंपरकर, आदींनी परिश्रम घेतले.

## पनवेल स्टेशन येथे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**




पनवेल स्टेशन येथे आयोजित रक्तदान शिबिराला रक्तदात्यांची उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला स्नेहदीप फाऊंडेशन चे संस्थापक ऋग्वेद रवींद्र कांडपिले, ज्ञानेश्वर कदम जे जे हॉस्पिटल ब्लड सेंटर मुंबई पिल्ले कॉलेजचे विद्यार्थी यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिराचे आयोजन पनवेल रेल्वे स्टेशन येथे सकाळी 9 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला एडवोकेट मनोज भुजबळ यांची उपस्थिती लाभली रक्तदान शिबिरासाठी मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी विद्यार्थी आणि रक्तदाते यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## कोकणस्थ (सं) वैश्य समाजाचा १३८ वा वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबईः-(प्रमोद तरळ)**

कोंकणस्थ (सं )वैश्य समाजाचा १३८ वा वर्धापनदिन सोहळा २ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या महात्मा गांधी सभागृहात समाज बांधवांच्या प्रचंड उपस्थितीत संपन्न झाला. रत्नागिरी,रायगड,कोल्हापूरसह मुंबई उपनगरातून, मुंबईच्या विविध भागातून वैश्य वाणी ज्ञाती बांधव मोठ्या संस्थेने उपस्थितीत होते. कोंकणस्थ (सं )वैश्य समाज ही संस्था138 वर्षे सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. संस्थेच्या वतीने समाजाच्या प्रत्येक घटकासाठी विविध उपक्रम राबविले जातात.वर्धापन दीना निमित्त संस्थेच्या वाटचालीत महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या स्व. विजय रामचंद्र हेगिष्टे यांना मरणोत्तर जीवन गौरव,विविध क्षेत्रात उल्लेखणीय कार्य केलेल्या ॲडव्होकेट सदानंद चिखले यांना वैश्य गौरव पुरस्कार, उद्योग क्षेत्रात क्षेत्रात उल्लेखणीय कामगिरी करणाऱ्या



व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या श्री. जयप्रकाश गांधी, रत्नागिरी, श्री. नितीन गांधी चिपळूण, श्री. सचिन भिंगार्डे, लांजा यांचा "उद्योगभुषण" पुरस्काराने सन्मान करण्यात आला. ज्ञाती बांधवांसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वैश्य समाज डोंबिवली या संस्थेला *वैश्य संस्था सन्मान " पुरस्काराने गौरव कारण्यात आला. व्यवस्थापक पंच मंडळाच्या ऊत्तम नियोजनाने वर्धापन दिन सोहळा पार पडला.

## पनवेलच्या विकासाला आयुक्तांचे पारदर्शक नेतृत्व, मानवी हक्क संरक्षण फेडरेशनकडून सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

पनवेल शहराला 'स्मार्ट सिटी' बनवण्याच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाची दखल घेत मानवी हक्क संरक्षण फेडरेशनने त्यांचा विशेष गौरव केला आहे. सोमवार, ११ ऑगस्ट रोजी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांची भेट घेऊन त्यांना सन्मानपत्र प्रदान केले.

या भेटीदरम्यान, फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर – कच्छी यांनी आयुक्तांचे पनवेल शहरासाठीचे महत्त्वपूर्ण योगदान आणि पारदर्शक कार्यप्रणालीची प्रशंसा केली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आयुक्त घेत असलेल्या पुढाकाराबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या खास भेटीत फेडरेशनने काही महत्त्वाच्या विषयांवर आयुक्तांशी चर्चा केली आणि एक निवेदन सादर केले. यावर आयुक्त चितळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, संबंधित मागण्यांवर लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार विकास पाटील, सुरज नागे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

आयुक्तांच्या या सहभागामुळे पनवेलकरांच्या आशा पल्लवित झाल्या असून, शहराच्या प्रगतीसाठी प्रशासन आणि सामाजिक संस्था यांच्यातील हा समन्वय महत्त्वाचा मानला जात आहे.

## सणसर येथे श्रावणी सोमवार निमित्त महादेव मंदिरात भंडारा

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर (ता इंदापूर) येथील महादेव मंदिरामध्ये श्रावणी सोमवार निमित्त अक्षय भैय्या निंबाळकर मित्र परिवाराच्या वतीने भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी युवा उदयोजक अक्षय निंबाळकर सणसर सोसायटी चे चेअरमन सुशील निंबाळकर तंटामुक्ती अध्यक्ष आबासाहेब निंबाळकर खजिनदार मिथुन बारवकर राहुल पाटील दत्तात्रय काळे आबासाहेब भोईटे विशाल पाटील पत्रकार रियाज सय्यद प्रवीण शिंदे जगदीश कांबळे संजय शिंदे रणजीत राजेभोसले तुषार निंबाळकर व ग्रामस्थ उपस्थित होते सध्या श्रावण महिना सुरू असून श्रावणी सोमवार निमित्त सणसर येथील महादेव मंदिराची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली मंदिरावर काही अनावश्यक झाडे उगवली होती ती तोडून स्वच्छता करण्यात आली अक्षय भैय्या निंबाळकर मित्र परिवाराच्या वतीने ग्रामस्थांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी भंडाऱ्याचा महाप्रसाद घेतला



## को.म.सा.प. उरण शाखेच्या वतीने पी.एम.श्री मुळेखंड शाळेतील भगवद्गीता पठण पारायण उपक्रमाचे भरभरून कौतुक.

### असा अनोखा अखंडित उपक्रम राबवणारी रायगड जिल्ह्यातील एकमेव शाळा " एल. बी.पाटील सर यांचे प्रतिपादन.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

पवित्र अशा श्रावण महिन्याचे औचित्य साधत दिनांक २३ जुलै २०२५ रोजी पी.एम.श्री शाळा मुळेखंड शाळेमध्ये भगवद्गीता पठन पारायण सोहळा अखंडित संपन्न होत आहे. आजतागायत एकही दिवस खंड न पाडता हा पठण पारायण सोहळा या शाळेमध्ये सुरू असून आज या पठण पारायण सोहळ्यास भेट देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरणची संपूर्ण टीम शाळेमध्ये उपस्थित राहिली होती. या कार्यक्रमासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख तथा मराठी साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य रायगड भूषण प्राध्यापक एल. बी.पाटील सर, कोमसाप शाखा उरणचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे सर बाल विभाग प्रमुख संजीव पाटील सर सचिव अजय शिवकर सर, नाटककार किशोर पाटील सर, सदस्य रमण पंडित सर,



नवीनशेवे केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर म्हात्रे साहेब ,यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सुरुवातीला शाळेच्या वतीने या सर्वांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून अध्याय अकरावा याचे वाचन सुरु झाले तदनंतर मच्छिंद्र म्हात्रे सर, किशोर पाटील सर व अजय शिवकर सर यांनी देखील अकरावा अध्यायातील१४ ते२०पर्यंतच्या श्लोकांचे वाचन करून विद्यार्थ्यांना अर्थ समजून दिला. मच्छिंद्र म्हात्रे सर यांनी विद्यार्थ्यांना भगवद्गीतेचे महत्त्व समजून दिले.

या शाळेने राबवलेला स्तुत्य असा उपक्रम नक्कीच महाराष्ट्रभर होणे गरजेचे आहे हे देखील पटवून दिले. विसरत चाललेली वाचन संस्कृती या शाळेने टिकवून ठेवण्याचा एक अनोखा यशस्वी उपक्रम केला आहे असे मत मांडले व सर्वांना शुभेच्छा दिल्या. तदनंतर प्राध्यापक एल.बी. पाटील सरांनी आपले मत मांडले त्यांनी उरणातीलच नव्हे तर रायगड जिल्ह्यातील एकमेव शाळा अशी आहे की, जिने वाचन संस्कृती टिकवण्यासाठी हा एक अनोखा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीला, वाचन संस्कृतीला जपून ठेवण्यासाठी अनोखा उपक्रम सुरू केला आहे निश्चितच आम्हाला त्याचा अभिमान आहे. भविष्यात असाच वारसा चालू राहो अशी देखील अपेक्षा व्यक्त केली त्याचप्रमाणे इतर सर्व मान्यवरांनी आपले मनोगते व्यक्त केली व या शाळेच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. शेवटी या केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर म्हात्रे सर यांनी देखील या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करून संस्कृत मधील श्लोक विद्यार्थी वाचत आहेत हे पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच काल झालेल्या द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या २५ व्या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये शाळेने सहभाग घेऊन बारा व चौदा वयोगटांमध्ये प्रथम व चतुर्थ क्रमांक पटकावल्याबद्दल कुमार महेंद्र नाईक व रवी शर्मा या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले. शाळेमध्ये नाविन्यपूर्ण होत असलेले उपक्रम आम्ही सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहत असतो. या शाळेने आगळीवेगळी ओळख तालुक्यात निर्माण केली आहे. त्याबद्दल सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती पालक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शेवटी या कार्यक्रमाची सांगता प्राध्यापक एल बी पाटील सर यांच्या आगरी पसायदानाने संपन्न झाली या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर,विद्या वाणी मॅडम,दिशा तांडेल मॅडम,या उपक्रमाचे सर्वेसर्वा संजय होळकर सर व अर्चना पाटील मॅडम यांची उपस्थिती लाभली.

## चुकीच्या शस्त्रक्रियेचा व ब्लडबँक नूतनीकरणातील भ्रष्टाचाराविरोधात मंगेश भगत यांचे सलग दुसऱ्या दिवशी आमरण उपोषण सुरू

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः- जितेंद्र खोडे**

यवतमाळ,दि.१२ ऑगस्ट :
चुकीच्या शस्त्रक्रियेमुळे कायम अपंगत्व,तसेच डीपीडीसी निधीतून ब्लडबँक नूतनीकरणातील कथित भ्रष्टाचार आणि लो फॅमिली इनकम क्लेममधील अनियमिततेबाबत जबाबदार डॉक्टर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी मंगेश उत्तमराव भगत (रा. उमरसरा, ता.जि.यवतमाळ) यांनी ११ ऑगस्टपासून वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. उपोषणकर्त्यांनी अधिष्ठाता डॉ. गिरीश जतकर ब्लडबँक प्रमुख डॉ. व्ही. येडशीकर,डॉ.शेख शब्बीर उर्फ पाशु,डॉ. अमोल देशपांडे,डॉ.स्वप्नील मदनकर,डॉ. विजय पोटे,डॉ.स्वप्नील शिंदे तसेच प्रशासकीय अधिकारी संतोष झिंजे यांच्यावर गंभीर आरोप करत,त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करून तत्काळ निलंबनाची मागणी केली आहे.ब्लडबँक



नूतनीकरण प्रक्रियेत अंदाजे १ कोटी ३७ लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.आज उपोषणाचा दुसरा दिवस असून,या आंदोलनाला शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांसह विविध सामाजिक संघटनांकडून पाठिंबा मिळत आहे.यावेळी कॉम्रेड सचिन मनवर,सोशल मीडिया काँग्रेस कमिटी यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके,सोशल ॲक्टिव्हिस्ट संघपाल बारसे,गौरीनंदन कन्नाके,शुभम शेंडे,विद्या परचाके आदी उपस्थित होते.उपोषणकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की,मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरूच राहील आणि या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील.

## तळा महसूल विभागाच्या वतीने हर घर तिरंगा जनजागृती रॅली..

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**

तळा : हर घर तिरंगा अभियानांतर्गत तळा महसूल विभागाच्या वतीने तळा बाजारपेठेमधून मंगळवार रोजी तिरंगा ध्वज जनजागृती बाईक रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तळा महसूल नायब तहसीलदार श्री. पालांडे सर यांनी रॅलीला हिरवा सिग्नल दिल्यानंतर रॅलीला सुरुवात करण्यात आली. महसूल नायब तहसीलदार श्री. धर्मराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली रॅली तळा तहसील ऑफिस पासून ते तळा बाजारपेठेमधून काढण्यात आली. रॅलीमधे तळा महसूल नायब तहसीलदार, कर्मचारी, तलाठी, मंडळ अधिकारी तसेच अन्य विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हर घर तिरंगा अभियान तीन टप्प्यात करावयाचा असून त्याबाबत शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने हर घर तिरंगा उत्साहाने राबवून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करा असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. किशन जावळे यांनी दिले आहेत. या अभियानांतर्गत ग्रामपंचायत नगरपरिषद नगरपंचायत जिल्हास्तरावर वेगवेगळ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. शाळा महाविद्यालयांमध्ये विविध विषयांचे आयोजन करण्यात यावे. शाळा कॉलेज महाविद्यालयांमार्फत तिरंगा ध्वज रॅली काढून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात यावी. असे निर्देश देण्यात आले. आहेत.



# आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास सुखकर; आ. महेश बालदी यांचा पुढाकार

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व ना. अशोक उईके यांच्या हस्ते झाले बससेवेचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून चौक विभागातील आदिवासी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा सुरू करण्यात आली असून या सेवेचा शुभारंभ विधान भवन येथे महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते आज करण्यात आले. या सेवेमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास सुखकर झाला आहे. या लोकार्पण सोहळ्याला आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर



रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, खालापूर मंडल अध्यक्ष प्रवीण मोरे, पनवेल पश्चिम मंडल अध्यक्ष रुपेश धुमाळ, गणेश कदम यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

उरण विधानसभेचे कार्यसम्राट लोकप्रतिनिधी आमदार महेश बालदी यांनी उरण विधानसभा मतदार संघातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी लक्ष केंद्रित केले. त्या अनुषंगाने त्यांच्यासाठी फिरता दवाखाना, घरकुल, सामाजिक सभागृह तसेच विविध पायाभूत सुविधा देण्याचे काम ते करत असून त्यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि आदिवासी समाजाच्या विकासासाठी आणखी एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. हि बस सेवा कलोते मोकाशी ठाकूरवाडी, कलोते खोंडा ठाकूरवाडी, कलोते रयती ठाकूरवाडी या मार्गावर धावणार आहे. या उपक्रमामुळे संबंधित भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी होणारी लांब पायपीट थांबेल आणि त्यांना सुरक्षित, सोयीस्कर व वेळेवर शाळेत पोहोचण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या सेवेमुळे केवळ शिक्षणाचा मार्ग सुलभ झाला नाही, तर आदिवासी समाजातील पालकांनाही आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत अधिक विश्वास आणि प्रोत्साहन मिळाला आहे. या उपक्रमासाठी जे. एम. बक्षी यांचे सहकार्य लाभले आहे.

आदिवासी समाज दुर्गम भागात राहतो, त्याला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम अशा उपक्रमातून होत आहे, त्यामुळे आमदार महेश बालदी यांनी राबविलेला उपक्रम अत्यंत स्त्युत्य आणि प्रेरणादायी आहे. अशी प्रतिक्रिया प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली, तर सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम आमदार महेश बालदी यांनी केल्याचे गौरवोद्गार आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी काढले. तसेच या महत्वपूर्ण अशा सामाजिक उपक्रमाबद्दल आमदार महेश बालदी यांचे दोन्ही मान्यवरांनी कौतुक केले.

## कल्याण फाटा ते मुंब्रा स्टँडवर उभी असलेल्या रिक्षाची मुंब्रा वाहतूक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फोडली काच

**. दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**

दि.१३,शिळ (ठाणे):–कल्याण फाटा सर्कल वर होणारी ट्रॅफिक जाम सोडवण्यात अयशस्वी ठरलेले आणि वसुलीत माहीर असलेले ट्रॅफिक विभागाचे अधिकारी आणि हवालदार आता आपल्या अपयशाचे राग गरीब रिक्शा वाल्यांवार काढतांना दिसून येत आहेत. दि.११ऑगस्ट च्या संध्याकाळी कल्याण फाटा ते मुंब्रा रिक्षा स्टॅन्ड वर उभी असलेल्या रिक्षाची काच मुंब्रा वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी फोडली, काहीही कारण नसताना ट्रॅफिकची समस्या सोडवता येत नाही म्हणून बिचाऱ्या गरीब रिक्षावाल्याची काच फोडण्यात आली त्यानंतर त्यांना विचारणा करण्यात आली,तेव्हा रिक्षा रोडवर असल्याचं कारण त्यांनी दिले,वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारणा आहे की तुम्हाला जर एवढी दबंगिरी करायचेच आहेत तर दहिसर ते उत्तर शिव पर्यंत रस्त्याच्या मध्ये गोडाऊन वाल्यांच्या गाड्या पार्किंगला लागलेल्या असतात त्या जाऊन फोडण्याची तुमच्या हिम्मत आहे का? कल्याण फाट्याच्या पुढे भारत इकोवीस्टाच्या समोर ज्या सेकंड हॅन्ड गाड्या विक्रीस ठेवलेल्या आहेत त्या सुद्धा अर्ध्या रोडवर आहेत त्या फोडण्याची तुमच्या हिम्मत आहे का? सिबली नगर पासून शिळ फाट्यापर्यंत हॉटेल वाल्यांच्या अर्ध्या रस्त्यावर गाड्या पार्किंग असतात त्या गाड्या फोडण्याची तुमची हिम्मत आहे का? पेपर चेक करायचा नावावर वसुलीसाठी पकडलेल्या गाड्या अर्ध्या रस्त्यावर उभ्या करून ठेवता मग त्या गाड्यांच्या काचा आम्ही रिक्षावाल्याने फोडायचा का? का फक्त गरीब रिक्शा वाल्यांच्या काचा फोडण्यात तुम्ही तुमची हिम्मत दाखवता. हे सर्व प्रश्न दैनिक युवक आधाराच्या माध्यमातून रिक्षावाल्यांनी मुंब्रा वाहतूक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारले आहेत. मुंब्रा वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी या प्रश्नांचे उत्तर देतील का याकडे सर्व रिक्षावाल्यांचे लक्ष लागून राहिलेले आहे, आणि ज्या रिक्षावाल्याची काच फोडली गेली आहे त्या रिक्षावाल्याला नुकसान भरपाई मिळेल का?




## विक्रोळीत पालिका आरोग्य व्यवस्थेची तिरडी

### आंदोलना पूर्वीच डॉ योगेश भालेराव पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर - केतन भोज**

मुंबई महानगर पालिकेतील रुग्णालयात रुग्णांना न मिळणारी सुविधा , अपुरे बेड, डॉक्टर आणि स्टाफ ची कमतरता या अभावामुळे रुग्णांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते. देशातील सर्वाधिक श्रीमंत पालिका म्हणून मुंबई महानगर पालिकेचा गवगवा होत असताना मुंबईतील रुग्णालयाची अवस्था इतकी बिकट का असा सवाल करत विक्रोळीतील समाजसेवक डॉ योगेश भालेराव यांनी पालिकेच्या आरोग्य खात्याची आज सकाळी तिरडी यात्रा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलनं होण्यापूर्वीच विक्रोळी पोलिसानी त्यांना ताब्यात घेतले. विक्रोळीतील डॉ बाबासाहेब



आंबेडकर रुग्णालय ते स्मशानभूमी पर्यंत ही तिरडी यात्रा काढण्यात येणार होती. समाजसेवक डॉ योगेश भालेराव यांनी सांगितले की मुंबई शहरा मध्ये 2/3 कोटी लोकसंख्या आहे. महापालिके अंतर्गत असलेल्या रुग्णालय मध्ये वार्ड व आय सी सी यू मध्ये तब्बल 15 हजारच्या सुमारास बेड आहेत. एवढे बेड 2/3 कोटी जनतेला पुरेसे आहेत का . जी व्यवस्था वेळेवर उपचार देत नाही , रुग्णांना बेड अभावी जमिनीवर उपचार घ्यावे लागतात अशा आरोग्य व्यवस्थेचे काय करायचे. पालिकेच्या ढासललेल्या आरोग्य व्यवस्थेची आम्ही आज तिरडी आंदोलन घेतले पण पोलिसानी आमचे हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे.

## चलो महानगरपालिका...चलो महानगरपालिका..पोल खोल धडक मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे सहसंपादक**

जनतेची दिशाभूल बंद करा, "शास्ती" नव्हे तर "मालमत्ता कर" माफ करा.पनवेल महानगरपालिका शास्ती माफी म्हणजे फक्त मालमत्ता करावरील व्याज/दंड होय, मालमत्ता करा मध्ये सूट अथवा माफी नव्हे

१) सत्ताधारी आपली दिशाभूल करून, आपणांस मंजूर नसलेल्या अवास्तव करासहित शास्तीसह (दंड/व्याज) वाढीव रक्कम भरायला लावतो आहे असे का...?

२) सत्ताधाऱ्यांनी सत्तेत येताना पाच वर्षे कर वाढ न करण्याचा वायदा केलेला असणे, सत्य परिस्थिती कर माफी नाहीच उलट दंड / व्याज ही वसुली असे का..?

३) शास्तीसह (दंड/व्याज) मालमत्ता कर भरल्यास कायम स्वरुपी मालमत्ता कराच्या बोज्याला सामोरे जावे लागणार असे का...?

४) पनवेल महानगर पालिका प्रत्यक्षात 'ड' वर्ग असताना, 'अ' वर्ग असलेल्या मुंबई व ठाणे सारख्या महापालिकासारखा कर दर का...?

५) मुंबई व ठाणे महापालिकांसारख्या सोय सुविधा नाही मग तरी मालमत्ता कर एवढा का....

६) स्टील मार्केटचा २६८ कोटींचा एल. बी. टी (L.B.T. TAX) कर माफ आणि सामान्य जनतेला करावरील फक्त दंड / व्याज माफी ते पण स्कीम नुसार असे का...?

७) जवळीलच नवी मुंबई महानगरपालिका मध्ये २० वर्ष मालमत्ता कर हा ग्रामपंचायत दराने असून ५०० चौ. मी. घरांना मालमत्ता करातून मुक्ती आहे. तर आपल्या नवनिर्वाचित महानगरपालिकेत मालमत्ता कर जास्त असे का..?बुधवार दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.०० वा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पनवेल महानगरपालिका कार्यालय.

## मा.राजेंद्र सपकळ यांची सोसायटीच्या चेअरमन पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसर:- विकास क्षत्रिय**

सपकळवाडी सोसायटी चेअरमन पदी राजेंद्र लालासो सपकळ व्हाईस चेअरमन पदी पोपट मारुती पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून नरसिंग सपकळ यांनी आपल्या चेअरमन पदाचा राजीनामा दिल्यानंतर संचालकाच्या झालेल्या मासिक मिटींगमध्ये राजेंद्र सपकळ यांची व व्हाईस चेअरमन पदी पोपट पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.सपकळवाडी सोसायटीने हे वर्ष ७५ वे आमृत महोत्सवी वर्ष साजरे केले आहे.सोसायटीचा नावलौकीक आहे यामुळे तालुक्यात राजकीय दृष्टीने याला अन्यन साधारण महत्व आहे आज सोसायटीच्या मासिक सभेमध्ये नरसिंग सपकळ यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या बैठकीत राजेंद्र सपकळ व पोपट पवार यांची दोन नावे आली.यामुळे हि निवड बिनविरोध झाली झालेल्या नवनियुक्त चेअरमन व व्हाईस




चेअरमन यांचा सत्कार बापुराव सपकळ मा संचालक छत्रपती सह सा कारखाना भवानीनगर बि के सपकळ मा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती इंदापुर अजित सपकळ युवा नेते सोसायटी संचालक ज्ञानेश्वर सपकळ पांडुरंग सपकळ अजित चव्हाण निलेश सपकळ रणसिंग सपकळ सचिव बाबासो सपकळ सुखदेव सपकळ उपस्थीत होते

## नांदूर्डी येथील वरदविनायक मंदिरात गणेश भक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

अंगारकी चतुर्थी, ज्याला अंगारकी संकष्टी चतुर्थी असेही म्हणतात , हा भगवान गणेशाला समर्पित एक अत्यंत शुभ हिंदू सण आहे. हा सण विशेषतः महत्त्वाचा आहे कारण तो संकष्टी चतुर्थी आणि आठवड्याचा दिवस, मंगळवार (अंगारक) या दोन्हींचे शुभफळ एकत्र करतो . भाविकांचा असा विश्वास आहे की या दिवशी उपवास आणि विशिष्ट विधी केल्याने अडथळे दूर होतात, इच्छा पूर्ण होतात आणि एकूणच समृद्धी मिळते. पौराणिक कथेनुसार, भगवान गणेशाचा भक्त अंगारक (ज्याला अंगारक असेही म्हणतात ) , त्याला त्याचे नाव भगवान गणेशाशी जोडावे अशी इच्छा होती. भगवान गणेशाने त्यांची इच्छा पूर्ण केली





आणि त्यामुळे या दिवसाचे नाव अंगारकी चतुर्थी असे पडले.

**दैवी आशीर्वादः**

असे मानले जाते की या दिवशी भगवान गणेशाने मंगळ ग्रहाला (ज्याला अंगारक असेही म्हणतात) आशीर्वाद दिला होता, ज्यामुळे त्याचे महत्त्व आणखी वाढले.

या वर्षातील पहिल्यांदाज आलेल्या मंगळवारी अंगारिका योगावर असलेल्या संकष्ट चतुर्थीला नांदुर्डी ता निफाड येथील वरदविनायक मंदिरात गणेश भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती ,नवसाला पावणारा वरदविनायक अशी ख्याती आणि श्रद्धा असलेल्या या मंदिरात पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावलेल्या होत्या.

वरदविनायक मंदिरात पहाटेपासून दर्शनासाठी श्री गणेश भक्तांनी गर्दी केली होती, नांदुर्डी येथील वरदविनायक मंदिरातील सेंदूरमय मूर्तीला पहाटे अभिषेक करण्यात आला ,अंगरिकेनिमित्ताने भाविकांची गर्दी लक्षात घेऊन वरदविनायक मंदिर ट्रस्टने मंदिराच्या परिसरात मांडव टाकून सावली केली होती,पाण्याची व्यवस्थाही केली होती ,परिसरातील निफाड,कारखाना,दावचवाडी,पिंपळगाव,शिरवाडे वणी,पालखेड, आदी गावातून अनेक महिला भाविक पायी देखील दर्शनाला येत असंल्याचे चित्र होते ,परिसरात प्रसादाची पूजा साहित्य व इतर अनेक दुकाने थाटलेली होती ,मंदिराचे पुजारी जगदिश व निलेश कुलकर्णी यांनी भाविकांना दर्शनासाठी मार्गदर्शन केले ,मंदिर ट्रष्टचे अध्यक्ष सुरेशबाबा पाटील व विश्वस्तांनी भाविकांच्या दर्शनाची उत्तम व्यवस्था केलेली होती रात्री उशिरा पर्यंत भाविकांची मंदिरात दर्शनासाठी गर्दी होती मंदिरावर विद्युत रोषणाई केली होती.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास सुखकर; आ. महेश बालदी यांचा पुढाकार

### प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व ना. अशोक उईके यांच्या हस्ते झाले बससेवेचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून चौक विभागातील आदिवासी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा सुरू करण्यात आली असून या सेवेचा शुभारंभ विधान भवन येथे महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते आज करण्यात आले. या सेवेमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास सुखकर झाला आहे.

या लोकार्पण सोहळ्याला आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, खालापूर मंडल अध्यक्ष प्रवीण मोरे, पनवेल पश्चिम मंडल अध्यक्ष रुपेश धुमाळ, गणेश कदम यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

उरण विधानसभेचे कार्यसम्राट लोकप्रतिनिधी आमदार महेश बालदी यांनी उरण विधानसभा मतदार संघातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी लक्ष केंद्रित केले. त्या अनुषंगाने त्यांच्यासाठी फिरता दवाखाना, घरकुल, सामाजिक सभागृह तसेच विविध पायाभूत सुविधा देण्याचे काम ते करत असून त्यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि आदिवासी समाजाच्या विकासासाठी आणखी एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. हि बस सेवा कलोते मोकाशी ठाकूरवाडी, कलोते खोंडा ठाकूरवाडी, कलोते रयती ठाकूरवाडी या मार्गावर धावणार आहे. या उपक्रमामुळे संबंधित भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी होणारी लांब पायपीट थांबेल आणि त्यांना सुरक्षित, सोयीस्कर व वेळेवर शाळेत पोहोचण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या सेवेमुळे केवळ शिक्षणाचा मार्ग सुलभ झाला नाही, तर आदिवासी समाजातील पालकांनाही आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत अधिक विश्वास आणि प्रोत्साहन मिळाला आहे. या उपक्रमासाठी जे. एम. बक्षी यांचे सहकार्य लाभले आहे.

आदिवासी समाज दुर्गम भागात राहतो, त्याला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम अशा उपक्रमातून होत आहे, त्यामुळे आमदार महेश बालदी यांनी राबविलेला उपक्रम अत्यंत स्त्युत्य आणि प्रेरणादायी आहे. अशी प्रतिक्रिया प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली, तर सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम आमदार महेश बालदी यांनी केल्याचे गौरवोद्गार आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी काढले. तसेच या महत्वपूर्ण अशा सामाजिक उपक्रमाबद्दल आमदार महेश बालदी यांचे दोन्ही मान्यवरांनी कौतुक केले.

## *पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ड’ मधील सहाय्यक आयुक्त रूपाली माने यांच्यावर मनमानी कारभाराचा आरोप*

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ड’ मधील सहाय्यक आयुक्त रूपाली माने यांच्यावर मनसे पनवेल महानगरपालिका कामगार सेनेचे उपाध्यक्ष दिपक कोळवणकर यांनी मनमानी कारभाराचा गंभीर आरोप केला आहे. माहितीच्या अधिकारात (RTI) अनधिकृत बांधकामांबाबत मागितलेल्या माहितीला जनमाहिती अधिकारी तेजस खोचे यांनी "ही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही" असे खोटे उत्तर पाठवले. यानंतर प्रथम अपील अधिकारी रूपाली माने यांनी देखील याबाबत कोणतेही उत्तर देण्यास टाळाटाळ केली. या प्रकारामुळे माहितीच्या अधिकार कायद्याचा भंग झाल्याचा आरोप कोळवणकर यांनी केला आहे. सामाजिक कार्यकर्ता दिपक कोळवणकर यांनी प्रभाग समिती ‘ड’ मधील अनधिकृत बांधकामांबाबत माहिती मागितली होती. मात्र, जनमाहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास नकार दिल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तरीही सहाय्यक आयुक्त रूपाली माने यांनी यावर कोणतीही कार्यवाही केली नाही किंवा उत्तर दिले नाही. यामुळे संतप्त झालेल्या कोळवणकर यांनी ‘आपले सरकार’ पोर्टलवर माने यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. तसेच, अशा जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्याची मागणी त्यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे. कोळवणकर यांनी म्हटले आहे की, "अनधिकृत बांधकामांसारख्या गंभीर विषयावर माहिती लपवणे हे लोकशाही आणि पारदर्शकतेच्या तत्त्वांना छेद देणारे आहे. अशा अधिकाऱ्यांमुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास कमी होत आहे." त्यांनी महानगरपालिका आयुक्तांना ई–मेल द्वारे आवाहन केले आहे की, या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.या घटनेमुळे पनवेल महानगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अनधिकृत बांधकामांसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. याबाबत पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून कोणती कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पिलीव व परिसरात श्रावण महिन्यानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न होताहेत "

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):**

–पिलीव व परिसरात श्रावण महिन्याच्या निमित्ताने गावोगावी श्री महादेव मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविक भक्तांची लगबग सुरू असून पिलीव येथील मुख्य पेठेतील श्री महादेव मंदिरात व गावाच्या उत्तरेला असलेल्या खडीच्या श्री महादेव मंदिरामध्ये भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी बहु गर्दी करीत असल्याचे दिसून येत आहे. पिलीव या ठिकाणी जुना पुराना परंतु सर्वांना आवडीचा असणारा गजी ढोल खेळ असतो.ग्रंथवाचन, भजन असे धार्मिक कार्यक्रम सुरू असून "श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे"याप्रमाणे थोड्याफार प्रमाणात पाऊस असल्याने निसर्ग सुद्धा श्रावण महिन्याचे स्वागत करीत असल्याचे दिसते. पिलीव व पिलीव परिसरातील गावांमध्ये भाविक भक्त श्री महादेव मंदिरामध्ये दर्शनासाठी बहु गर्दी करीत असल्याचे समजते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्याचा लोकाभिमुख आदर्श हरवलेला मोबाईल मालकाकडे सुखरूप परत

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे**



"जनतेची सेवा हीच खरी पोलीस सेवेची ओळख" हे शब्द अक्षरशः साकार करत अंभोरा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहायक पोलीस निरीक्षक आदरणीय मंगेश साळवे साहेब यांनी हरवलेला मोबाईल आणि पर्स शोधून मालकाकडे सुखरूप परत केला.
गंगादेवी येथील संताराम शिरसाट यांच्या पत्नीचा मोबाईल फोन व पर्स काही दिवसांपूर्वी हरवला होता. तक्रार आल्यानंतर साळवे साहेबांनी तांत्रिक तपास, चतुराई आणि पोलिसी कौशल्याचा वापर करून हरवलेल्या वस्तूंचा शोध लावला.
आज संध्याकाळी नेमक्या ७:०० वाजता, साळवे साहेबांनी शिरसाट सरांना पोलीस स्टेशनला सन्मानपूर्वक बोलावून मोबाईल आणि पर्स त्यांच्या स्वाधीन केले. वस्तू परत मिळाल्याने शिरसाट सरांच्या चेहऱ्यावर दिलासा आणि समाधान स्पष्ट दिसत होते.
या कार्यामुळे साळवे साहेबांविषयी नागरिकांमध्ये प्रचंड कौतुकाची भावना व्यक्त होत आहे. "अशा अधिकारीमुळे जनतेचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास दुपटीने वाढतो," असे ग्रामस्थांनी सांगितले.
शिरसाट सरांनी व उपस्थित ग्रामस्थांनी साळवे साहेबांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांचे मनापासून आभार मानले.

## गिलाणी महाविद्यालयात करिअर संधी बद्दल कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**
**- घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

शि.प्र.मं. विज्ञान व गिलानी कला वाणिज्य महाविद्यालय घाटंजी येथे दि. 8 ऑगस्ट 2025 रोजी आय.क्यू.ए.सी. व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने करियर संधी बद्दल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. करियर संधी बद्दल उदासीन असलेल्या युवकांच्या मनामध्ये नवचेतना निर्माण करण्यासाठी महाविद्यालयाने सर्व विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी करियर संधी व शासनाच्या विविध सोयी सुविधा या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयीन करिअर गायडन्स सेल चे प्रमुख डॉ. प्रदीप राऊत सर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रेडियंट अकॅडमी यवतमाळ चे संचालक श्री अमोल चेपे सर उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनामध्ये श्री चेपे सर यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा व त्यामधून घडणारे अधिकारी तसेच शासनाच्या विविध शिष्यवृत्ती व अधिकारी बनण्यासाठीचे मार्गदर्शन घेण्यासाठी शासनाकडून मिळणारी मदत या बद्दल सखोल माहिती दिली यामध्ये विशेषतः सारथी, बार्टी ,महाज्योती यासारख्या शिष्यवृत्तीची माहिती विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. राऊत सर यांनी आजच्या युवा वर्गाला व त्यांच्या इच्छा शक्तीला दिशा देण्याची गरज, विद्यार्थ्यांची समाजाप्रती असणारी जबाबदारी याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. महाविद्यालयीन जीवनानंतर स्वतःच्या आयुष्याला दिशा देण्याचा एक चांगला संदेश घेत विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे सार्थक केले.





## भाजपची उत्तर रायगड जिल्हा कार्यकारणी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक निवडणुका सुरू असून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आणि पक्षाच्या नियमानुसार जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी उत्तर रायगड जिल्हा पदाधिकाऱ्यांची नवीन कार्यकारणी जाहीर केली. या कार्यकारणी मध्ये चार सरचिटणीस (महामंत्री) आठ उपाध्यक्ष, आठ चिटणीस एक कोषाध्यक्ष व इतर कार्यकारी सदस्य अशी ९० जणांची कार्यकारिणीची घोषणा केली. यामध्ये ३३ टक्के महिला पदाधिकारी, एससी, एसटी पदाधिकारी यांना पक्षाच्या घटनेप्रमाणे पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.
या कार्यकारिणीत सरचिटणीस म्हणून दीपक बेहेरे, माजी नगरसेवक नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. तर उपाध्यक्ष म्हणून सुधीर ठोंबरे, अश्विनी पाटील, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, प्रल्हाद केणी, चंद्रकांत घरत, गणेश कडू, मयुरेश नेतकर व समीर कदम यांना संधी देण्यात आली आहे. चिटणीस म्हणून नितीन कांदळगावकर, माजी जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील, रवीनाथ पाटील, शरद ठाकूर, विद्या तामखेडे, विनिता घुमरे, सायली म्हात्रे, शामला सुरेश यांना जबाबदारी देण्यात आली असून कोषाध्यक्षपदी अभिलाषा ठाकूर यांना कायम ठेवण्यात आले आहे. त्यासह नगरसेवक व लोकप्रतिनिधी यांना कार्यकारीणी सदस्य म्हणून संधी देण्यात आली आहे. उत्तर रायगड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पक्षाची १७ मंडल, तीन विधानसभा आणि चार तालुक्यांमध्ये विभाजित झाली आहेत. पक्षाच्या सूचनेप्रमाणे सर्व मंडले, सर्व विधानसभा व सर्व समाज घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. या नियुक्तीनंतर लवकरच विविध आघाड्या, सेल, व प्रदेश सदस्य जाहीर करण्यात येणार आहे.
या नियुक्तीबद्दल नवनियुक्त पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार सुरेशभाऊ लाड, कोकण म्हाडाचे माजी चेअरमन बाळासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, रवीशेठ भोईर, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी अभिनंदन केले आहे.

## राजकीय सीमा ओलांडून नेत्याला केले अभिवादन तर स्वर्गीय आ. रावसाहेब अंतापूरकर यांच्या जयंतीनिमित्त आ.जितेश अंतापूरकर यांच्या हस्ते वृक्षारोपन.

**दैनिक युवक आधार**
**देगलूर वार्ताहर**

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आणि दिवंगत आमदार,स्वर्गीय रावसाहेब अंतापूरकर यांच्या जयंतीनिमित्त,त्यांच्या समाधीस्थळी अंतापूर येथे दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी आदरांजली वाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने सर्वपक्षीय कार्यकर्ते,पदाधिकारी आणि नागरिकांनी गर्दी केली. आपल्या लाडक्या नेत्याच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनसमुदाय जमला होता.
यावेळी देगलूर बिलोली मतदार संघाचे आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी सकाळीच आपले वडिल स्वर्गीय रावसाहेब अंतापूरकर यांच्या समाधीस्थळी आदरांजली अर्पण केले.त्यानंतर त्यांनी उपस्थित हजारो नागरिकांची आपुलकीने भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी अनेकांनी त्यांच्यासोबत आपल्या भावना व्यक्त केल्या.
स्वर्गीय रावसाहेब अंतापूरकर यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याची आठवण यावेळी अनेकांनी सांगितली.त्यांच्या कार्याची छाप आजही जनमानसावर किती गहरी आहे,याचे दर्शन या गर्दीतून घडले.



रावसाहेब अंतापूरकर यांनी आपल्या आमदारकीच्या काळात या भागाच्या विकासासाठी केलेले कार्य आजही लोकांच्या स्मरणात आहे.त्यांच्या कार्याचा वारसा त्यांचे पुत्र आमदार जितेश अंतापूरकर पुढे चालवत असल्याचा विश्वास अनेकांनी व्यक्त केला.या जयंतीदिनी,कै.रावसाहेब अंतापूरकर यांना आदरांजली वाहण्यासाठी विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी,कार्यकर्ते,समाजमाध्यम प्रतिनिधि,शैक्षणिक,सामाजिक, औद्योगीक क्षेत्रातील आणि सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.तर यावेळी स्वर्गी आमदार रावसाहेब अंतापूरकर यांच्या जयंतीनिमित्त आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.
यावेळी मा.पं.स.सभापती शिवाजीराव देशमुख बळेगावकर, देगलूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष शंकरराव कंतेवार,देगलूर शहर भाजप मंडळ अध्यक्ष प्रशांत दासरवार,सरचिटणिस दिपक संगमकर देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील,तहसिलदार भरत सुर्यवंशी,अंतापुर नगरीचे सरपंच हणमंत डोपेवार मा.सरपंच हणमंत पाटील,हणेगाव नगरीचे सरपंच प्रतिनिधी शंकरराव राठोड, भाजपा पदाधिकारी अभय देशमुख पबितवार सावकार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## सर्व खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू राहील - परेश ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

आमदार प्रशांत ठाकूर आणि श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे अकॅडमीला शक्य ती सर्व मदत केली जाईल. तसेच पनवेल महानगरपालिकेने अनेक खेळांची मैदाने उभारली असून, सर्व खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू राहील असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी प्रतिक क्रिकेट अकॅडमीच्या स्नेहमेळाव्यात केले.
शहरातील मार्केट यार्डमधील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात प्रतिक क्रिकेट अकॅडमीचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात अकॅडमीतील गुणवंत आणि यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या अध्यक्ष्यतेखाली आणि रणजीपटू ऋषभ पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. यावेळी अकॅडमीचे प्रशिक्षक प्रतिक मोहिते, अध्यक्ष अंकल बहिरा, डॉक्टर संतोष जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. संतोष जाधव यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी अकॅडमीला स्वतःचे मैदान नसल्याने विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणात येत असलेल्या अडचणींवर लक्ष वेधले. त्यानंतर निलेश पाटील यांनी अकॅडमीच्या कार्याविषयी माहिती दिली. स्नेहमेळाव्यात मुंबई संघात निवड झालेली तनिषा शर्मा, जिओ कपमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारी स्वरा, तसेच रायगड जिल्हा संघात निवड झालेले क्रिश, आराध्य, श्रेय, अर्णव, पार्थ, वेदांत आणि ईशान यांसारख्या गुणवंत खेळाडूंचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक आणि ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. या स्नेहमेळाव्याला अकॅडमीचे विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सिद्धिविनायक वधू वर सुचक केंद्र आयोजित कोकणस्थ कुणबी वधूवर नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**

रविवार दि. २७ जूलै २०२५ रोजी झालेल्या १८ व्या नोंदणी अभियानाला कोकणस्थ कुणबी वधूवरांनी मोठ्या प्रमाणात सहभाग देऊन कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून कुणबी समाजोन्नती संघ मुंबई महिला मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. गोंधळी मॅडम, कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा संगमेश्वरचे अध्यक्ष श्री. संजय गोंधळी, चिटणीस श्री. प्रदीप धुमक साहेब,सेवानिवृत्त डेप्युटी सेक्रेटरी मंत्रालय मुंबई श्री. शांताराम कुदळे, सामाजिक कार्यकर्ते श्री. संजय बालगुडे, संजय निवाते उपस्थित राहून वधूवरांना मार्गदर्शन केले. यावेळी ऋतुजा निवाते M.ARCH ( गुहागर ) आणि श्री . आशिष गोणबरे C.A. ( गुहागर ) श्री. आशुतोष सनगरे MS IN MECHANICAL ENGINEERING FORM USA ( संगमेश्वर ) श्री. सतीश वीर MASTER OF GLOBAL MANAGEMENT FORM CANADA यांच्या पालकांचा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याप्रमाणे उपस्थितीत मान्यवरांचा सत्कार श्री सिद्धिविनायक वधूवर सुचक केंद्राचे संस्थापक अध्यक्ष श्री शिवराम जांभळे यांच्या हस्ते करण्यात आला. वधूवरांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. थोड्याच दिवसात १९ वे नोंदणी अभियान घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी 8928067597 / 9869507866 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.




## "आदेश जिल्हाधिकाऱ्यांचा... पण मोकाट ट्रकवाल्यांचा सुळसुळाट! उपप्रादेशिक परिवहन, वाहतूक पोलीस, पीडब्ल्यूडी गप्प!"

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा

रायगड जिल्ह्यातील आठ धोकादायक पुलांवरून अवजड वाहनांच्या वाहतुकीस जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आठ दिवसांपूर्वीच तात्काळ बंदीचे आदेश काढले. परंतु अलिबाग–रोहा मार्गावरील नवखार व रामराज या दोन पुलांवर आजही पहाटेच्या वेळी डंपर, खासगी ट्रकांची उघड उघड वाहतूक सुरूच आहे. प्रश्न असा आदेश काढणारे जिल्हाधिकारी, त्याची अंमलबजावणी करणारे वाहतूक पोलीस, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग नेमके करत तरी काय आहेत?गणेशोत्सव दारात आला असताना, जर या पुलांवर अपघात होऊन जीवित किंवा वित्तहानी झाली, तर जबाबदार कोण? जनतेचा सवाल थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचला आहे "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गप्प का?"ऑडिटनेच धोक्याची घंटा वाजवली होती विजना कन्सल्टिंग इंजिनिअरिंग प्रा. लि. या संस्थेच्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये अलिबाग–रोहा, अलिबाग–रेवदंडा, पोयनाड–उसर–भादाणे व भाकरवड–देहेन या मार्गांवरील आठ पुलांचे व स्लॅब कलवर्टचे स्थिती अत्यंत धोकादायक असल्याचे उघड झाले. या पुलांची भार क्षमता फक्त ५ ते १६ टन असून पावसाळ्यामुळे ती आणखी कमी झाली आहे. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अवजड वाहतूक बंदीचे लेखी आदेश दिले होते.पुलावर 'बंदीचा' नव्हे तर 'सावकाश चला'चा फलक !जिल्हाधिकारी आदेशानुसार पुलावर अवजड वाहतुकीवर बंदीचे स्पष्ट फलक लावणे हे पीडब्ल्यूडीचे कर्तव्य होते. पण प्रत्यक्षात रामराज व नवघर पुलाजवळ "वाहने सावकाश चालवा" असा गोंधळात टाकणारा फलक लावून थातुरमातुर काम उरकले. बंदी कुठे आहे? आणि अंमलबजावणी कुठे आहे?
आदेशाची उघडपणे पायमल्ली पहाटेच्या वेळी खासगी ट्रक, डंपर चालक धोकादायक पुलांवरून निर्धास्तपणे जात आहेत. वाहतूक पोलीस, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पीडब्ल्यूडी आणि स्थानिक प्रशासन हे सर्वच गप्प आहेत. अशा उघडपणे आदेशभंग होत असताना कारवाईचा प्रश्नच नाही !जनतेची प्रशासनाला थेट हाक
"जिल्हाधिकाऱ्यांची बंदी फक्त कागदावर ठेवून काय उपयोग? अपघात घडला तर जबाबदारी कोणाची? जनतेचे प्राण धोक्यात घालून खासगी ट्रकवाल्यांना मोकळीक देणे थांबवा," असा संतप्त स्वर गावोगावी उठला आहे.



## महाराष्ट्र नवनिर्मान वाहतुक सेनेच्या मावळ लोकसभा उपाध्यक्ष पदी सतिश बिपीन पाटील यांची नियुक्ती !!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर ऋषिकेश सुरशे**

महाराष्ट्र नवनिर्मान सेनेचे अध्यक्ष मा.श्री. राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र नवनिर्मान वाहतुक सेनेच्या मावळ लोकसभा क्षेत्रातील पनवेल,कर्जत, उरण,मावळ,चिंचवड,पिंपरी,या मतदार क्षेत्रातील (ट्रक युनिट) उपाध्यक्ष पदी संतोष बिपीन पाटील यांची निवड करण्यात असून आज सोमवार दि. ११/०८/२०२५ रोजी नियुक्ती पत्र महाराष्ट्र नवनिर्मान वाहतुक सेनेचे सरचिटणीस मा.श्री. आरिफ शेख यांनी देऊन वाहतुकदारांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्परता दाखवून सक्रीय राहून वाहतुकदार ट्रक मालक,ड्रायव्हर यांना उद्‌भवणा-या अडीअडचणींची सोडवणूक करून त्यांना न्याय देणासाठी सदैव तत्परता द्यावी असा सल्ला देऊन पुढिल वाटचलीस शुभ आर्शिवाद दिले.



मा.श्री.सतिश बिपीन पाटील यांची महाराष्ट्र नवनिर्मान वाहतुक सेनेच्या मावळ लोकसभा मतदार पनवेल,उरण,कर्जत,मावळ,पिंपरी,चिंचवडच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल महाराष्ट्र नवनिर्मान सेनेमध्ये उत्साहाचे वातावरण असून मा.श्री. सतिश बिपीन पाटील यांच्यावर वाहतुकदारासह सर्व स्थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रत्यक्ष कर संकलनात सुमारे ४ टक्के घसरण

## मोठ्या प्रमाणावरील परताव्याचा परिणाम

**नवी दिल्ली :** या आर्थिक वर्षात आतापर्यंत निव्वळ प्रत्यक्ष कर संकलन ३.९५ टक्क्यांनी घसरून ६.६४ लाख कोटी रुपये झाले आहे. मुख्यतः मोठ्या प्रमाणावरील परताव्याचा हा परिणाम असल्याचे मंगळवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीत दिसून आले. कंपन्या, व्यक्ती आणि व्यावसायिक आणि इतर संस्थांनी भरलेल्या उत्पन्नावरील कर प्रत्यक्ष करात समाविष्ट आहेत.

निव्वळ कॉर्पोरेट कर संकलन सुमारे २.२९ लाख कोटी रुपये झाले, तर बिगर-कॉर्पोरेट करात (ज्यामध्ये व्यक्ती, हिंदू अविभाजित कुटुंबे (एचयूएफ)




### चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कर ६.६४ लाख कोटींवर

आणि कंपन्या यांचा समावेश असून ते ४.१२ लाख कोटी रुपये झाले. १ एप्रिल ते ११ ऑगस्टदरम्यान सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) संकलन २२,३६२ कोटी रुपये होते.

एकूण निव्वळ संकलन सुमारे ६.६४ लाख कोटी रुपये होते, जे गेल्या आर्थिक वर्षात (२०२४-२५) याच कालावधीत जमा झालेल्या ६.९१ लाख कोटी रुपयांपेक्षा ३.९५ टक्के कमी आहे. या आर्थिक वर्षात आतापर्यंत जारी केलेले परतावे १० टक्क्यांनी वाढून १.३५ लाख कोटी रुपये झाले आहेत.

१ एप्रिल ते ११ ऑगस्टदरम्यान एकूण कर संकलन (परताव्यापूर्वी) ७.९९ लाख कोटी रुपये होते, जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील ८.१४ लाख कोटी रुपयांपेक्षा १.८७ टक्क्यांनी कमी आहे.

### चालू आर्थिक वर्षात २५.२० लाख कोटी संकलनाचा अंदाज

चालू आर्थिक वर्षात (२०२५-२६) सरकारने प्रत्यक्ष कर संकलन २५.२० लाख कोटी रुपये होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे, जो मागील वर्षाच्या तुलनेत १२.७ टक्क्यांनी जास्त आहे. आर्थिक वर्ष २६ मध्ये एसटीटीमधून ७८,००० कोटी रुपये गोळा करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

## सोने हजाराने, चांदी दोन हजारांनी स्वस्त

**नवी दिल्ली :** जागतिक बाजारात विक्रीच्या माऱ्यामुळे मंगळवारी राजधानी दिल्लीत सोन्याचा भाव १,००० रुपयांनी घसरून १,०१,५२० रुपये प्रति १० ग्रॅम झाला, असे ऑल इंडिया सराफा असोसिएशनने म्हटले आहे.

सोमवारी, ९९.९ टक्के शुद्ध मौल्यवान धातूचा भाव १,०२,५२० रुपये प्रति १० ग्रॅम झाला. स्थानिक बाजारात, ९९.५ टक्के शुद्ध सोन्याचा भाव मंगळवारी १,००० रुपयांनी घसरून १,०१,१०० रुपये (सर्व करांसह) प्रति १० ग्रॅम झाला.

दरम्यान, चांदीच्या भावात मंगळवारी २,००० रुपयांनी घसरण होऊन १,१२,००० रुपये प्रति किलो (सर्व करांसह) झाला. सोमवारी तो १,१४,००० रुपये प्रति किलो झाला. जागतिक पातळीवर, न्यू यॉर्कमध्ये स्पॉट गोल्डचा भाव ०.१३ टक्क्यांनी वाढून ३,३४७.१८ डॉलर प्रति औंस झाला.

# किरकोळ महागाईचा ८ वर्षांचा नीचांक

## जुलैमध्ये १.५५ टक्क्यांपर्यंत घसरली



**नवी दिल्ली :** भाज्या आणि धान्यांसह अन्नधान्यांच्या किमती कमी झाल्यामुळे जुलैमध्ये किरकोळ महागाई ८ वर्षांच्या नीचांकी १.५५ टक्क्यांवर घसरल्याचे मंगळवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार स्पष्ट झाले. जुलैमध्ये वार्षिक आधारावर अन्न महागाई दर (-) १.७६ टक्के राहिला.

जूनमध्ये ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) आधारित महागाई २.१ टक्के आणि जुलै २०२४ मध्ये ३.६ टक्के होती. जुलै २०२५ मधील महागाई जून २०१७ नंतरची सर्वात कमी आहे जेव्हा ती १.४६ टक्के होती.

जुलै २०२५ मध्ये मुख्य महागाई आणि अन्नधान्याच्या महागाईत लक्षणीय घट मुख्यतः अनुकूल आधारभूत परिणाम आणि डाळी आणि उत्पादने, वाहतूक आणि दळणवळण, भाज्या, धान्य आणि उत्पादने, शिक्षण, अंडी आणि साखर आणि मिठाई यांच्या महागाईत घट झाल्यामुळे झाली आहे, असे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) म्हटले आहे.

# ४,५९४ कोटी गुंतवणुकीच्या चार चिप प्लांटना मंत्रिमंडळाची मंजुरी

## ओदिशा, पंजाब, आंध्र प्रदेशमध्ये उभारणार प्रकल्प

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाने ओडिशा, पंजाब आणि आंध्र प्रदेशसाठी चार सेमीकंडक्टर प्रकल्पांना मान्यता दिली आहे, अशी माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंगळवारी दिली. इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे, ज्याचा खर्च देशात चिप सुविधा उभारण्यासाठी ७६,००० कोटी रुपयांचा आहे.

वैष्णव म्हणाले की, मंत्रिमंडळाने ओदिशा, पंजाब आणि आंध्र प्रदेशमध्ये चार सेमीकंडक्टर प्लांटना मान्यता दिली आहे. भुवनेश्वरमध्ये सिलिकॉन कार्बाइड सेमीकंडक्टर प्लांटची स्थापना करण्यात येईल. त्यामध्ये सिलिकॉन कार्बाइड सेमीकंडक्टर



प्लांट उभारला जाईल. या प्रकल्पामध्ये २,०६६ कोटी रुपये गुंतवणुकीचा समावेश असेल. राज्यात १,९४३ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा ३डी ग्लास उत्पादनासाठी आणखी एक प्लांट उभारण्यात येईल. ३डी ग्लास सेमीकंडक्टर प्लांटला अमेरिकेतील आघाडीची तंत्रज्ञान कंपनी इंटेल, लॉकहीड मार्टिन इत्यादी कंपन्यांकडून गुंतवणूक मिळेल.

### जलविद्युत प्रकल्पासाठी ८,१४६.२१ कोटींच्या गुंतवणुकीला मान्यता

केंद्र सरकारने ७०० मेगावॉट क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्पासाठी ८,१४६.२१ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला मंगळवारी मान्यता दिली. या प्रकल्पाची पूर्णता ७२ महिने आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारांवरील मंत्रिमंडळ समितीने मंगळवारी अरुणाचल प्रदेशातील शी योमी जिल्ह्यात टाटो-II जलविद्युत प्रकल्प बांधण्यासाठी ८,१४६.२१ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला मान्यता दिली, असे त्यात म्हटले आहे. ७०० मेगावॉट (४ x १७५ मेगावॉट) स्थापित क्षमतेच्या या प्रकल्पातून २,७३८.०६ दशलक्ष युनिट ऊर्जा निर्माण होईल.

# गुंतवणूकदारांची सावधगिरी

## सेन्सेक्स ३६८ अंकांनी घसरला

**मुंबई :** मंगळवारी अस्थिर व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांक घसरले. देशांतर्गत आणि अमेरिकन महागाईच्या आकडेवारीपूर्वी सावधगिरी बाळगल्याने ब्लू-चिप बँक शेअर्सची विक्री झाल्याचा हा परिणाम आहे. गुंतवणूकदार १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या अमेरिका-रशिया चर्चेच्या संकेतांचीही वाट पाहत आहेत. दरम्यान, भारतीय चलन बाजरात मंगळवारी अमेरिकन डॉलरच्या तुलेनत रुपया ३ पैशांनी मजबूत होऊन ८७.७२ वर बंद झाला.

बीएसई सेन्सेक्स ३६८.४९ अंकांनी किंवा ०.४६ टक्क्यांनी घसरून ८०,२३५.५९ वर बंद झाला. दिवसभरात तो ८०,९९७.६७ चा कमाल आणि ८३३.३१ अंकांनी कोसळून ८०,१६४.३६ ची किमान पातळी



ब्लू-चिप बँक शेअर्सची विक्री

गाठली होती. अशाच प्रकारे एनएसई निफ्टी ९७.६५ अंकांनी किंवा ०.४० टक्क्यांनी घसरून २४,४८७.४० वर बंद झाला.

सेन्सेक्स कंपन्यांपैकी बजाज फायनान्स, ट्रेंट, हिंदुस्तान युनिलिव्हर, एचडीएफसी बँक, इटरनल, बजाज फिनसर्व्ह, आयसीआयसीआय बँक आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स आदी समभाग घसरले. तथापि, मारुती, टेक महिंद्रा, महिंद्रा अँड महिंद्रा आणि एनटीपीसी यांचे समभाग वधारले.

जागतिक व्यापारातील चालू घडामोडींमुळे राष्ट्रीय बाजारपेठेत अस्थिरता दिसून आली, जी अमेरिका-चीन टॅरिफला मुदतवाढ दिल्यानंतर आणि आज उशिरा जाहीर होणाऱ्या प्रमुख महागाई आकडेवारीच्या आधी सावधगिरी दर्शवली. टॅरिफशी संबंधित परिणामाची कोणतीही चिन्हे असलेले यूएस चलनवाढीचे आकडे फेडच्या धोरणात्मक भूमिकेवर परिणाम करू शकतात, असे जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले.

बीएसई मिडकॅप गेज ०.२५ टक्क्यांनी घसरला आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.०४ टक्क्यांनी किंचित वाढला. बीएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, बँकएक्स ०.८३ टक्क्यांनी, कॅपिटल गुड्स (०.७६ टक्के), रिअल्टी (०.७५ टक्के), टेलिकम्युनिकेशन (०.४६ टक्के) आणि एफएमसीजी (०.४४ टक्के) घसरले. तेल आणि वायू, आरोग्यसेवा, धातू, उपयुक्तता, आयटी आणि बीएसई केंद्रित आयटी क्षेत्र वधारले.

जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड ०.१८ टक्क्यांनी वाढून ६६.७५ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचला. एक्सचेंज डेटानुसार, सोमवारी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) १,२०२.६५ कोटी रुपयांचे शेअर्स विकले.

सोमवारी, सेन्सेक्स ७४६.२९ अंकांनी किंवा ०.९३ टक्क्यांनी वाढून ८०,६०४.०८ वर स्थिरावला. निफ्टी २२१.७५ अंकांनी किंवा ०.९१ टक्क्यांनी वाढून २४,५८५.०५ वर स्थिरावला.

# जमावाच्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू

**जळगाव :** जामनेर येथे पोलीस भरतीचा अर्ज भरण्यासाठी आलेल्या बेटावद खुर्द येथील सुलेमान रहिमखान पठाण (२१) या तरुणाला संशयावरून काही तरुणांनी बेदम मारहाण केली. घरी परतल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. सोमवारी दुपारी घडलेल्या या घटनेनंतर जामनेरमध्ये तणाव निर्माण झाला. पोलीस तपासात दहा संशयितांची नावे समोर आली असून, त्यापैकी दोघांना ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

सुलेमान पठाण हा बारावी उत्तीर्ण असून पोलीस भरतीची तयारी करत होता. सोमवारी तो अर्ज दाखल करण्यासाठी जामनेरला आला होता. एका कॅफेत बसला असताना काही तरुणांनी त्याला बाहेर खेचत मारहाण करण्यास सुरुवात केली. बस स्थानकातही त्याला मारहाण झाल्याचे सांगितले जाते.

घरी बेटावद खुर्दला परतल्यावर त्याने पालकांना घटना सांगितली, पण काही वेळातच तो कोसळला. तातडीने जामनेर उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर एका समुदायाने जामनेर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी घटनास्थळी जाऊन जमाव शांत केला. सुलेमानच्या मृत्यूप्रकरणी वडील रहीमखान पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, संशयितांपैकी दोघांना ताब्यात घेतले आहे.

# २५४ कोटींचा घनकचरा व्यवस्थापन प्रस्ताव केंद्राकडे

**इचलकरंजी :** स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत इचलकरंजीतील घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा बळकट करण्यासाठी तब्बल ₹२५४ कोटींचा वित्तीय प्रस्ताव केंद्र सरकारचे गृहनिर्माण व नागरी कार्य मंत्री मनोहर लाल खट्टर यांना सादर केल्याची माहिती खासदार धैर्यशील माने यांनी दिली.

प्रस्तावानुसार, इचलकरंजीला महानगरपालिकेचा दर्जा मिळाल्याने सक्षम पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक पद्धतीने कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचा महापालिकेचा संकल्प आहे. यामध्ये १०० टीपीडी बायो-सीएनजी प्रकल्प, ५० टीपीडी ऑप्टिकल सॉर्टिंग एमआरएफ,



"कचरा-मुक्त शहर हा उपक्रम राबवून इचलकरंजीला स्वच्छ सर्वेक्षणात अव्वल स्थान मिळवता येईल तसेच आरोग्य, पर्यावरण व नागरिकांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा होईल."
– **धैर्यशील माने**, खासदार

बांधकाम व पाडकाम कचरा प्रक्रिया केंद्र, वस्त्रोद्योग व धोकादायक कचरा व्यवस्थापन, इलेक्ट्रिक वाहनाद्वारे घर-घर कचरा संकलन, प्रत्यक्ष वेळेतील डिजिटल मॉनिटरिंग, जनजागृती मोहिमा, विकेंद्रित कंपोस्टिंग आणि शहर सौंदर्यीकरण यांचा समावेश आहे.

निधी उभारणीसाठी केंद्र व राज्य सरकारचे सहकार्य, १५ वा वित्त आयोगाचे अनुदान, पीपीपी पद्धतीने गुंतवणूक आणि कार्बन क्रेडिट महसूलाचा वापर करण्याची योजना आहे. यामुळे १००% स्त्रोतावर कचरा विभागणी, सर्व कचऱ्याची वैज्ञानिक प्रक्रिया, पुनर्वापरातून महसूल, आणि "कचरा-मुक्त शहर" दर्जा मिळवण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे.

# भिवंडीत भाजप नेत्यासह चुलत भावाची हत्या

**भिवंडी :** भाजपच्या युवा नेत्यासह त्याच्या चुलत भावाची कार्यालयाबाहेरच निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना भिवंडीत तालुक्यातील खारबाव चिंचोटी रस्त्यावरील खार्डी गावातील कार्यालयाबाहेर घडली आहे. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात १२ हल्लेखोरांविरोधात दुहेरी हत्याकांडाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**१२ जणांवर गुन्हा दाखल**

प्रफुल्ल तांगडी, (४२ ) आणि तेजस तांगडी (२२) अशी हत्या झालेल्या युवकांची नावे असून मृतक प्रफुल्ल हे भाजप युवा मोर्चा ठाणे ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. तर विकी भरत म्हात्रे, कल्पेश रामदास वैती, अजय सुरेश तांगडी, महेंद्र नामदेव तांगडी, व्यानंद नामदेव तांगडी, सुनिल सुभाष भोईर, प्रसाद गजानन तांगडी, मोहन बाळकृष्ण तांगडी, नऊस नरेश नांदुरकर व विजय एकनाथ मुकादम, रवींद्र एकनाथ मुकादम, जितेश मधुसुदन गवळी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रफुल्लचे याच गावात मुख्य रस्त्यावर जे.डी. टी. इंटरप्रायझेस नावाचे व्यावसायिक कार्यालय आहे. याच कार्यालयातून प्रफुल्ल आणि तेजस हे दोघेही घरी जाण्यास निघाले असता धारधार शस्त्र हातात असलेल्या चार ते पाच हल्लेखोरांनी दोघांवर सपासप वार केले.

# सिल्लोड तालुक्यात पावसाने फिरवली पाठ, जोमात आलेली पिके पावसाअभावी सुकून जाऊ लागल्याने शेतकरी हतबल

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- राज्यात व जिल्ह्यात विविध भागात पाऊस पडत असताना गेल्या पंधरा दिवसापासून सिल्लोड तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्याने जोमात आलेली पिके कोमेजून जात आहे. या पिकांना जोरदार पावसाची गरज आहे. एक-दोन दिवसात जोरदार पाऊस न पडल्यास खरिपाची पेरणी वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये आहे.

सिल्लोड तालुक्यातील विरगाव, खुल्लोड, पांगरी, घंटाब्री, जळकी, मोहळ, हट्टी, सासुरवाडा, बहुली, उंडणगाव, अंभई, आदी शिवारासह काही भागात पावसाचा एकही थेंब पडत नसल्याने खरीप हंगामावर मोठे संकट कोसळले आहे. परिसरातील शेतामध्ये मका, सोयाबीन, कापूस, उडीद, बाजरी, अशी विविध पिके पावसाअभावी करपू लागली आहेत. जवळपास ५०% पिके पाण्याविना वाया गेल्यासारखा अंदाज शेतकरी व्यक्त करत आहेत.शेत शिवारात उभ्या पिकांची वाढ खुंटली असून



पावसाअभावी पिके सुकून पिवळी पडत आहेत. त्यातच वातावरणात उष्ण झालेला बदल यामुळे पिके जास्त प्रमाणात कोमेजू लागली आहे. विहिरींचा आधार घेण्यासाठी मुबलक प्रमाणात पाणी नसल्याने व थोड्याफार प्रमाणात पाण्याची उपलब्धता असताना पिकांना पाणी देण्यासाठी प्रयत्न केला तरी महावितरण कडून ऐनवेळी दिवसभरात लाईट वारंवार ड्रीप होत असल्याने शेतकऱ्यांसमोर दररोज एक नवे संकट उभे राहत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

आर्थिक गुंतवणूक मातीमोल ठरणार

शेतकऱ्यांनी यंदा चांगल्या पिकासाठी महागडी खते, बी-बियाणे, औषधे यावर मोठा खर्च करून पिके जोमात आणले असताना आता मात्र तोच खर्च पावसाअभावी वाया जातो की काय हे दुःख शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत आहे. वाढती महागाई, मजुरांचे वाढलेले भाव याला शेतकऱ्यांना सद्यस्थितीत तोंड द्यावे लागत असताना जर एक-दोन दिवसात पाऊस झाला नाही तर घामाचे पैसे वाया जाण्याची भीती शेतकरी वर्गात आहे. एकंदरीत आठवडाभरात पाऊस न झाल्यास शासनाने तातडीने कृत्रिम पावसाची पावले उचलावीत अशी मागणी शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# घाटंजी न.प. मुख्याधिकारी तथा प्रशासक मा. राजु घोडके यांना हिरकणी पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि महेश पेन्दोर**

समाजात लोकप्रिय असलेल्या व विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे उत्तम आयोजक म्हणून नावलौकिक असलेल्या भोई गौरव मासिकाच्या वतीने रविवार दिनांक 10 ऑगस्ट 2025 रोजी विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, मधुराम सभागृह, झाशी राणी चौक सीताबर्डी नागपूर येथे महाराष्ट्रातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व अधिकारी, पदाधिकारी यांचा कला गौरव करण्यात आला

या कार्यक्रमात घाटंजी नगर परिषदेचे मुख्याधिकारी राजू घोडके यांना माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या स्वच्छ भारत अभियान मोहिमेमध्ये सहभाग घेऊन घाटंजी शहराचा चेहरा-मोहरा बदलविला व घाटंजी शहराला जिल्ह्यात व देशात ऐतिहासिक दर्जा मिळवुन दिल्या बद्दल भोई गौरव मासिका तर्फे त्यांना "हिरकणी" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिथे बोलताना माननीय मुख्याधिकारी राजू घोडके यांनी






या पुरस्काराचे श्रेय संपूर्ण घाटंजीतील शहरवासीयांना दिल आहे. व जोपर्यंत घाटंजी नगर परिषदेला कार्यरत राहील तोपर्यंत शहरासाठी प्रामाणिकपणे काम करत राहील व शहराच्या विकासासाठी झटत राहील असे आश्वासनही दिले.

त्याचसोबत युवा लेखक प्रमोद तुमाने यांच्या उत्कृष्ट लेखणीबद्दल व भोई गौरव मासिकाला तळागाळात पोहोचवण्याच उत्कृष्ट काम केल्याबद्दल व नगरपरिषद शाळेतील विद्यार्थी सोहम गिनगुले या विद्यार्थ्यांने खुल्या गटातून जलतरण स्पर्धेत ब्रास मेडल व सिल्वर मेडल मिळवल्याबद्दल तसेच द्रोपद कुरवाडे या विद्यार्थ्यांने JEE, NEET, MHCET उत्कृष्ट यश मिळवल्याबद्दल तसेच अनेक विद्यार्थ्यांचे व अधिकारी पदाधिकारी त्यांचे गुणगौरव व सत्कार करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यसभा माजी खासदार पद्मश्री डॉक्टर विकास महात्मे, दैनिक सकाळ निवासी संपादक प्रमोद काळबांडे, प्राध्यापक महेंद्र खेडकर, गोपाळ धारपवार, डॉक्टर श्रीकृष्ण ढाले, बाळू कावनपुरे, प्रमोद दिघोरे, राहुल हरसुळे, नंदू पडाल, राजाराम म्हात्रे प्रकाशजी लोणारे, व भोई गौरव मासिक चे मुख्य संपादक चंद्रकांतजी लोणारे तथा अनेक मान्यवर उपस्थित होते.